
मंगळवार, ३ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २८५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे जर्मनीत जल्लोषात स्वागत



**बर्लिन** : पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या युरोप दौऱ्यावर आहेत. ते जर्मनीतील बर्लिनमध्ये पोहचले असता तेथील विमानतळावर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर पंतप्रधान थेट हॉटेलमध्ये गेले. तेथेही भारतीयांकडून त्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत झाले. स्वागत समारंभात लहान मुलेदेखील उपस्थित होती. या वेळी पंतप्रधान मोदींनी मान्या या चिमुरडीची भेट घेतली. तिने मोदींचे चित्र साकारले होते. हे चित्र पाहून पंतप्रधान मोदींनी तू माझेच चित्र का रेखाटले? असा प्रश्न केला. त्यावर मान्याने तुम्ही माझे आदर्श आहात, असे उत्तर दिले. यानंतर पंतप्रधानांनी मान्यासोबत फोटो काढला आणि तिने काढलेल्या चित्रावर स्वाक्षरी केली. दरम्यान, पंतप्रधान मोदींच्या युरोप दौऱ्यामुळे भारत-युरोपियन संघ शिखर परिषदेसाठी आणि मुक्त व्यापार करार चर्चेला चालना मिळण्याची शक्यता आहे.

### अंतरंग

माणगाव जोरघाटात अपघात; २१ जण जखमी/२

महाडमध्ये लाकडाची अनधिकृत वाहतूक रोखली/५

कर्जतचा कबड्डीपटू आकाशची जिल्हा संघात निवड/८

## पेण अर्बन बँक ठेवीदारांना न्याय द्या!

# सर्वपक्षीय धरणे आंदोलन

## भाजप आमदारांनी उपस्थित राहून दिला पाठिंबा

**पेण : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँक घोटाळ्यात भरडल्या गेलेल्या ठेवीदारांच्या न्याय हक्कांसाठी राज्य शासनाचे लक्ष वेधून घेण्याकरिता संघर्ष समितीच्या माध्यमातून मंगळवारी (दि. २) पेण नगर परिषदेसमोरील हुतात्मा कोतवाल चौकात सर्वपक्षीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास भाजपच्या चार आमदारांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.



(छाया : अनिस मनियार)

घोटाळा झाल्याने पेण अर्बन बँकेवर २३ सप्टेंबर २०१० रोजी रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आणि रायगडसह मुंबईमध्ये १८ शाखा असणारी ७५ वर्षे जुनी बँक आर्थिक दिवाळखोरीत गेली. त्याला आता १२ वर्षे उलटून गेली, मात्र राज्य शासन व अधिकाऱ्यांनी उदासीनतेचे धोरण अवलंबिल्याने ठेवीदारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष समितीच्या माध्यमातून पुन्हा एकदा शासनाचे लक्ष वेधून घेण्याकरिता पेण नगर परिषदेसमोरील कोतवाल चौकात मंगळवारी सर्वपक्षीय धरणे आंदोलन करण्यात आले.

या वेळी माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार संजय केळकर, आमदार महेश बालदी यांच्यासह माजी आमदार धैर्यशील पाटील, नगराध्यक्ष प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष वैशाली कडू, जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, डी. बी. पाटील, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर, शोमेर पेणकर, हिमांशू कोठारी, माजी सभापती प्रकाश पाटील, देवात साकोस्कर, संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव, पदाधिकारी, ठेवीदार, खातेदार उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार संजय केळकर यांनी सांगितले की, गेली १२ वर्षे म्हणजेच एक तप संघर्ष समितीच्या माध्यमातून आपण लढा देत आहोत. ठेवीदारांना कशा प्रकारे मदत करता येईल यासाठी विविध बैठका, आंदोलने वेळोवेळी करण्यात आली. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात पेण अर्बन बँकेचा मुद्दा मांडला असून हा लढा अविरत सुरूच राहील. ज्या प्रकारे कर्नाळा बँकेच्या ठेवीदारांना आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी हे पाठपुरावा करून न्याय मिळवून देत आहेत त्याच धर्तीवर पेण अर्बन बँक लुटारूंचा हिशोब तर चुकता करायचा आहे, परंतु प्रथम लक्ष या बँकेच्या ठेवीदारांना पैसे कसे परत मिळवून देता येईल याकडे राहणार आहे. यासाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावेच लागणार आहे. जे बोगस ठेवीदार आहेत त्यांना अटक व्हायला हवी. जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री करण्याबाबत जी कमिटी नेमली आहे त्यांचेसुद्धा या बाबतीत दुर्लक्ष होत आहे. राज्य सरकारने या गोष्टींकडे जातीने लक्ष घालून लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावावा तसेच केंद्रातील अर्थराज्यमंत्री अनुराग ठाकूर यांची भेट घेऊन अर्बन बँक प्रश्नाचा तिढा केंद्राच्या माध्यमातून कसा सोडविता येईल यासाठीही पाठपुरावा सुरू आहे.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी अर्बन बँकेच्या भ्रष्टाचारातील मुख्य आरोपी शिशिर धारकर यांच्यावर हल्लाबोल केला. धारकर पेणमध्ये राजरोसपणे फिरत असून लोकांना भूलथापा देण्याचे काम करीत आहे. या भ्रष्टाचारी माणसाला अर्बन बँकेच्या पैशांसंदर्भात जाब विचारणे गरजेचे आहे. पेण नगर परिषदेचे पाणीपुरवठा योजनेचे पाच कोटी रुपये रसातळाला घालविण्याचे काम या संचालक मंडळाने केले असून अशांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. गोरगरीब जनतेचा तळतळाट या भ्रष्टाचाऱ्याला लागल्याशिवाय राहणार नाही, असे सांगून या लढ्यात पुन्हा एकदा सर्वांनी एकत्रित, संघटित राहून ठेवीदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू, असे आश्वासन आमदार रविशेठ पाटील यांनी दिले.

पेण अर्बन बँकेच्या संघर्षात गेली अनेक वर्षे लढा देत असलेले लोकप्रतिनिधी, ठेवीदार यांच्या लढ्याचे कौतुक करीत आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, या ठिकाणी ठेवीदारांच्या गेली १२ वर्षे असलेली मनातील जखम अजून भरलेली नसून ती कशा प्रकारे भरून निघेल याकडे लक्ष देणे लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आम्ही वेळोवेळी विधासभेत अर्बन बँकेचा हा प्रश्न उपस्थित केला. पनवेलमधील कर्नाळा बँकेत कोट्यवधींचा घोटाळा झाला. त्याविरोधात आम्ही लढा देत १५ हजार खातेदारांच्या पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी केंद्र सरकारने केलेल्या विमा कायद्यानुसार परत मिळवून देण्याचे काम केले. **(पान २ वर..)**

## संजय राऊत, पुढील ४८ तासांत माफी मागा!

### किरीट सोमय्यांकडून मानहानी नोटीस

**मुंबई : प्रतिनिधी**



युद्धनौका आयएनएस विक्रांतसंदर्भात बदनामी केल्याचा आरोप करीत भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शिवसेना खासदार संजय राऊत यांना पुढील ४८ तासांत माफी मागितली नाही, तर आम्ही कायदेशीर कारवाई करू, असा इशारा नोटिसीद्वारे दिला आहे. ते सोमवारी (दि. २) मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि संजय राऊत महाडरपोक लोक आहेत. त्यांनी मागील तीन महिन्यांत १२ वेळा स्टंटबाजी केली, मात्र त्यांना एकाही आरोपबद्दल कागदपत्र सादर करता आले नाही. उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांच्यामार्फत ५७ कोटी रुपयांच्या विक्रांत घोटाळ्याचा आरोप केला. नील सोमय्यांच्या कंपनीत चार बिल्डर्सनी मनी लॉण्डरिंग केले, असा आरोप केला. आता उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांना कागदपत्रे आणि खात्यांची माहिती घेऊन पोलिसांकडे पाठवावे. ते भित्रे लोक आहेत. त्यांचा भ्रष्टाचार उघड होतोय आणि त्यांची संपत्ती जप्त होणार म्हणून घाबरून ते काहीही आरोप करीत आहेत.

माझ्या पत्नीने त्यांना मानहानी खटला दाखल करण्याबाबत नोटीस दिली आहे. त्यांनी पुढील ४८ तासांत माफी मागितली नाही, तर आम्ही कायदेशीर कारवाई करू. खोटे बोलून विरोधी पक्षातील नेत्यांना जेलमध्ये टाकणाऱ्यांचा पर्दाफाश केला पाहिजे, असेही सोमय्या म्हणाले.

### त्यांना त्यांची जागा दाखवून देणार!

आता मी मुंबई पोलिसांना सांगणार आहे की, त्यांनी संजय राऊत यांना बोलवावे आणि ५७ कोटी घोटाळ्याची कागदपत्रे त्यांच्याकडून घ्यावीत. 'लाथों के भूत बातों से नही मानते'. म्हणून माझी पत्नी प्रा. मेधा सोमय्या यांनी नोटीस दिली आहे. दोन दिवसांत उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी माफी मागितली नाही, तर आम्ही त्यांच्यावर बदनामी, मानहानीचा दावा दाखल करणार आहोत. त्यांना त्यांची जागा दाखवून देणार आहोत, असेही या वेळी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले.



**पनवेल : आर्या स्पोर्ट्स ओवळे आणि ग्रामस्थ मंडळ ओवळे-दापोली आयोजित आमदार ट्रॉफी आणि सिद्धेश ट्रॉफी स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी भेट देत शुभेच्छा दिल्या. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड, दापोलीचे माजी उपसरपंच गजानन पाटील, संजय गायकवाड, रूपेश गायकवाड, पाटणोलीचे माजी उपसरपंच प्रकाश पाटील, युवा नेते निलेश खारकर, संदीप पाटील, धर्मा म्हात्रे आदी उपस्थित होते.** **(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)**

## आरतीचा निर्णय मनसेकडून रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या औरंगाबादमधील सभेनंतर अक्षय्यतृतीयेला अर्थात ३ मे रोजी राज्यभरात होणाऱ्या महाआरतीचा निर्णय रद्द करण्यात आला आहे. स्वतः राज यांनी ही माहिती दिली.

'उद्या ईद आहे. कालच्या संभाजीनगरच्या सभेत त्याबाबत बोललो आहेच. मुस्लिम समाजाचा हा सण आनंदाने साजरा व्हावा. आधी ठरल्याप्रमाणे अक्षय्यतृतीया या आपल्या सणाच्या दिवशी कुठेही आरत्या करू नका. आपल्याला कोणाच्याही सणात बाधा आणायची नाही. भोंग्यांचा विषय धार्मिक नसून सामाजिक आहे आणि त्याबाबत आपण पुढे काय करायचे हे मी उद्या सांगेन,' असे राज यांनी म्हटले आहे.




### निवडक

**लसीसाठी जबरदस्ती नको : सर्वोच्च न्यायालय**

**नवी दिल्ली** : लसीकरणासाठी कोणावरही जबरदस्ती केली जाऊ शकत नाही, असा महत्त्वाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे, मात्र त्याचवेळी कोर्टाने समाजाच्या रक्षणासाठी सरकार काही निर्बंध लावू शकते, असेही स्पष्ट केले आहे. कोरोना लस घेणे अनिवार्य करण्याला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. त्यावर कोर्टाने निकाल देत लसीसाठी जबरदस्ती करणे असंवैधानिक असल्याचे म्हटले आहे.

**मुझफ्फरनगरमध्ये तब्बल ९०० कोटींचे ड्रग्ज जप्त**

**मुझफ्फरनगर** : दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) दिल्लीच्या शाहीन बाग येथून अटक केलेल्या ड्रग्जतस्कर हैदरशी निगडीत उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथील अड्ड्यावरुन १५० किलोहून अधिक हेरॉइन जप्त केले आहे. या हेरॉइनची किंमत तब्बल ९०० कोटी रुपये इतकी आहे. गुजरात एटीएसने हैदरच्या मुझफ्फरनगर येथील शेजाऱ्याच्या घरावर छापा टाकला आणि हेरॉइन जप्त केले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त नावड्यात कार्यक्रम; मान्यवरांची उपस्थिती



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा नावडे शहर व मैत्री प्रतिष्ठान यांच्या वतीने उत्सव महाराष्ट्राचा-संस्कृती महाराष्ट्राची हा बहरदार संगीतमय कार्यक्रम तसेच विशेष सन्मान पुरस्कार सोहळा रविवारी (दि. १) रंगला. या सोहळ्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले, तर या सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

नावडे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित या सोहळ्यास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेवक हरेश केणी, नगरसेविका दर्शना भोईर, भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष अमर ठाकूर, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, जिल्हा सदस्य पवन भोईर, ज्येष्ठ नेते रवींद्र खानावकर, नावडे शहर अध्यक्ष मदन खानावकर, पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर, जितेंद्र काटकर, युवा नेता महेश पाटील, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

**गुणीजनांचा विशेष सन्मान**

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्हा समालोचक अध्यक्ष संदीप पाटील, रवींद्र भोईर, मुख्याध्यापक बबन काटकर, संदीप मोरे, सचिन पाटील , ठाणे महापालिका उपअभियंता अविनाश आव्हाड, युवा नेता मुकेश वाळूंग, डॉ. सुमन मिश्रा यांचा विशेष सन्मान करण्यात आला.



# माणगाव जोरघाटात पीकअपचा अपघात

## २१ जण जखमी



**माणगाव : वार्ताहर**

निजामपूर येथून बाजार व रेशन घेवून निघालेली 'पिकअप' गाडी जोर घाटातील अवघड वळणावरून जात असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. गाडी रस्त्याच्या खड्ड्यात जावून उलटली. हा अपघातात २१ व्यक्ती जखमी झाले असून बोरवाडी ते जोर गावा दरम्यान घडला. या जखमीपैकी सात जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयातून पुढील उपचारासाठी मुंबई येथे पाठविण्यात आले. उर्वरित १४ जखमींवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार चालू आहेत.

घटनेची माहिती मिळताच माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील तसेच माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, तसेच पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तर निजामपूर मधील ग्रामस्थांनी या घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेची सविस्तर हकीकत अशी की, निजामपूर येथून बाजार व रेशन घेऊन जोर ता. माणगाव या आपल्या गावी २१ महिला व पुरुष बोलेरो पिकअप गाडीने (नंबर एम.एच. ४६ बी.एफ.०६४०) सोमवारी सकाळी ११ वाजता निघाले. त्यावेळी बोरवाडी ते जोर या रस्त्यावरून जाताना ही पिकअप गाडी एका अवघड वळणावर आली असता या गाडीवरील चालकाचा ताबा सुटला. गाडी रस्त्याच्याकडेला १०० मीटर अंतरावर जावून खड्ड्यात कोसळली. अपघातात आनंद भाद्रिके (६५), आशा करंजे (५२), राजेंद्र देशमुख, सुप्रिया ढवळे (३५), लक्ष्मण ढवळे (६०), विठोबा सावंत (६०), गंगूबाई ढवळे (६०) हे सात प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना मुंबई येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. तर उर्वरित मोतीराम वाघमारे (६५), राजू तेलंगे, संगीता भद्रिके (४५), पांडुरंग भद्रिके, शीतल भद्रिके, वर्षा शेलार, नारायण भद्रिके (५५), राधाबाई मोहिते (५०), कृषाबाई कुनके, शकुंतला भद्रिके (६०), चंद्रकांत करंजे (४५), सुभाष कुनके (४२), शंकर भद्रिके (७८), निलेश भद्रिके बोलेरो पिकअप चालक, सर्व रा. जोर हे १४ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या घटनेची माहिती निजामपूर भागात समजताच अनेक नागरिक व नातेवाईकांनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात एकच धाव घेतली. माणगाव पोलीस ठाण्यात या अपघाताची उशिरा नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## महाडमध्ये दोन टेम्पोंची धडक; तीन महिलांना उडविले

**महाड** : दोन टेम्पोंची समोरासमोर धडक झाल्यानंतर, एका टेम्पोंने उडविल्याने तीन पादचारी महिला गंभीर जखमी झाल्या. महाड शहरानजीक गांधारपाले गावाजवळ सोमवारी दुपारी हा अपघात झाला. यात एका टेम्पोंचा चालकही या अपघातात जखमी झाला आहे.



महामार्गावर गांधारपाले या गावानजीक दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास एक आयशर टेम्पो आणि एक छोटा टेम्पो यांच्यात समोरासमोर धडक झाली. त्यानंतर छोट्या टेम्पोंने गांधारपाले येथून चालत महाडकडे जात असलेल्या आशा शिगवण (५०), वनिता गायकवाड (६०) आणि सुमन जाधव (६५), सर्व रा. गांधारपाले, ता. महाड) यांना उडविले. या अपघातात या तिघी गंभीर जखमी झाल्या. या अपघातात छोट्या टेम्पोचा चालक अंकूश सरोज हा देखील जखमी झाला आहे. या चारही जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# राज्यात उष्णतेच्या लाटेमुळे २५ जणांचा उष्माघाताने मृत्यू

## दोन महिन्यांतील सर्वाधिक बळी नागपूरमध्ये

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा वाढत चालला आहे. गेल्या दोन महिन्यांत राज्यात उष्माघातामुळे तब्बल २५ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात राज्याची उपराजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपुरात सर्वाधिक मृत्यू झाले आहेत. एप्रिल महिन्यात नागपूरमध्ये उष्माघाताने नऊ लोकांचा मृत्यू झाला. उष्माघाताच्या बळींची गेल्या आठ वर्षांतील ही उच्चांकी नोंद आहे.

एप्रिल महिन्यात नागपूरमध्ये उष्माघाताने ९ लोकांचा मृत्यू झाला. २ ते ४ एप्रिलदरम्यान ही मृत्यू संख्या दोन होती. १६ एप्रिलपर्यंत ही संख्या वाढून चार झाली, मात्र मागच्या दोन आठवड्यात उन्हाचा तडाखा आणखी वाढला. एप्रिल महिना संपेपर्यंत उष्माघाताच्या एकूण मृतांचा आकडा नऊच्या वर पोहोचला आहे. मे महिन्यात उन्हाचा तडाखा आणखी वाढणार असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

यंदा मार्च ते एप्रिल या दोन महिन्यांत राज्यात जवळपास ३७४ जणांना उष्माघाताची बाधा झाली आहे. त्यात सर्वाधिक सुमारे ४४ टक्के मृत्यू नागपुरमध्ये झाले. विदर्भात उष्णतेच्या लाटेमुळे तापमान ४५ अंशांच्यापुढे गेले आहे. या उन्हाच्या तडाख्याने विदर्भात नागरिक हैराण झाले आहेत.

भारतीय हवामानशास्त्र विभाग आणि एनसीडीसीद्वारे राज्यांसह सामायिक केल्या जाणाऱ्या दैनंदिन उष्णतेच्या सूचनांवरुन पुढील ३ ते ४ दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हा दैनंदिन देखरेख अहवाल राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्रासोबत शेअर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यांचे आरोग्य विभाग, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि तळागाळातील कामगारांना उष्णतेबद्दल संवेदनशील बनवावे लागणार आहे, तसेच त्यांची क्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू ठेवावे लागतील असेही केंद्रीय आरोग्य सचिव भूषण यांनी म्हटले आहे.

# सिडकोच्या निवासी, निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसह वाणिज्यिक गाळे अर्जास मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या १५३ निवासी, १८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांसह २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीच्या योजनेच्या ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. अक्षय्य तृतीया तसेच रमजान ईदच्या प्रसंगी नागरिकांना या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेता यावा यासाठी सिडकोतर्फे सदर योजनांना मुदत वाढ देण्यात आली आहे.

या मुदतवाढीमुळे नागरिकांना योजनेकरिता अर्ज करण्यास पुरेसा अवधी देखील प्राप्त होणार आहे. या अनुषंगाने अनामत रक्कम भरणा, बंद निविदा सादर करणे, ई-लिलाव प्रक्रियांसही मुदतवाढ देण्यात आली आहे.

१५३ निवासी वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास सहा मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास पाच मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस सहा मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल ९ मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. १८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास ६ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास ५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस ६ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. २७५ वाणिज्यिक गाळ्यांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास १७ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास १६ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस १७ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्जदारांनी सिडकोच्या www.eauction.cidcoindia.com या संकेतस्थळास भेट द्यावी. या सुवर्णसंधीमुळे नागरिकांचा अक्षय्य तृतीयेचा आणि रमजान ईदचा आनंदही द्विगुणीत होणार असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.संजय मुखर्जी यांनी म्हटले आहे.

## कला शिक्षकांच्या मानधनात वाढ

**पुणे : वार्ताहर**

कला संचालनालयाच्या अखत्यारितील कला महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसाठी तासिका तत्त्वावर अध्यापन करणारे शिक्षक आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार पदवी आणि पदव्युत्तर पदविका, पदवीच्या शिक्षकांना आता सैद्धांतिक तासिकेसाठी ६२५ रुपये आणि प्रात्यक्षिकासाठी ३०० रुपये, तज्ज्ञ मार्गदर्शकांना ७५० रुपये, पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षकांना सैद्धांतिक तासिकेसाठी ६२५ आणि प्रात्यक्षिकासाठी २५० रुपये मानधन दिले जाईल


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No. : EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-2/22-23 (RFX No. 7000022975) | | | Period for submission of E-Bid: 02.05.2022 to 09.05.2022 up to 23:59 hrs. | | |
|---|---|---|---|---|---|
| Name of Work : AMC of restoration and maintenance of the SECURITRON make Fire Detection and Alarm system provided at 400kV R.S., Kharghar | | | | | |
| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical opening date | Commercial opening date |
| Limited to Rs. 10,00,000/ (Including GST) | Rs. 10,000/- | Rs. 500/- + GST | 09.05.2022 up to 23:59 hrs | 10.05.2022 at 10:01 hrs. (If possible) | 10.05.2022 at 10:15 hrs. (If possible) |

**Contact Persons :**
1) Mr. S.O.Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**
1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.
MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**SD/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**


# मनसेचे आता चलो अयोध्या!

## मुंबईत झळकली पोस्टर्स

**मुंबई : प्रतिनिधी**

औरंगाबादमधील बहुचर्चित सभेनंतर मनसेने आता ५ जून रोजी 'चलो अयोध्या' असे आवाहन केले आहे. याची पोस्टर्स मुंबईत झळकली असून राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला नागरिकांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन मनसेकडून करण्यात आले आहे.



राज ठाकरे यांची रविवारी औरंगाबादमध्ये सभा झाली. या वेळी त्यांनी भोंग्यांच्या मुद्द्याचा पुनरूच्चार करीत मशिदींवरील अनधिकृत भोंगे उतरवण्यासाठी ३ मेपर्यंतची डेडलाईन देतो; अन्यथा दुसऱ्या दिवशीपासून मशिदींसमोर मनसेकडून हनुमान चालिसा लावण्यात येईल, असा इशारा दिला.

औरंगाबादमधील सभेनंतर राज्यात काही ठिकाणी सभा घेण्याचे राज ठाकरे यांनी जाहीर केले आहे. त्यानंतर ५ जून रोजी ते अयोध्या दौरा करून प्रभू श्रीरामांचे दर्शन घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईत पोस्टर्स लागली आहेत.

मनसेने लावलेली पोस्टर्स मराठी आणि हिंदी भाषेत असून त्यावर मोठ्या अक्षरात 'जय श्रीराम' असे लिहिण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मी धर्मांध नाही, मी धर्माभिमानी... असे नमूद करून पुढे चलो अयोध्या असे म्हटले आहे.

पान १ वरून

## सर्वपक्षीय धरणे आंदोलन

पाच लाख रुपयांच्या आतील जवळजवळ ३५७ कोटी रुपये अद्याप मिळवायचे आहेत. अर्बन बँकेच्या लढ्यात कायदेशीर तसेच काही ठिकाणी राजकीय अडथळेसुद्धा आले. यामध्ये ईडीच्या बाबतीत काही प्रक्रिया असतील, तर केंद्र शासनाची मदत घेता येईल. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन मार्ग काढण्यात येईल. त्या अनुषंगाने कृतीशील कार्यक्रम आखावे लागतील. यापुढे कायदेशीर मार्गाने व रस्त्यावरची लढाई करावी लागणार असून यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी ठेवीदारांसाठी मोठा संघर्ष उभारून पुन्हा एकदा शासनपर्यंत ठेवीदारांच्या तीव्र भावना पोहचवाव्या लागतील.

माजी आमदार धैर्यशील पाटील यांनीही ठेवीदारांसाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन केले, तर प्रास्ताविकात पेण अर्बन संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी बँकेच्या लढ्यात पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींनी उपस्थित राहून ठेवीदारांच्या पाठीशी ठाम असल्याचे दाखवून दिले त्याबद्दल आभार मानले. त्यांनी पेणमध्ये उजळ माथ्याने फिरणाऱ्या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी तसेच ठेवीदारांना पैसे मिळावेत या एकच भावनेतून हा लढा देत असून लेखापरीक्षक विक्रम वैद्य यांना प्रक्रियेतून हटवावे, अशी मागणीही या वेळी केली.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :- 7000023146** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-22/2022-2023.** RFx e-tender for Supply of Silica Gel, Cotton Cloth, Petroleum Jelly and Polythene Paper at various substation under EHV O&M Division Panvel. **Tender amount Rs. 4,30,398/- EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading the RFx . | **02.05.2022, 17:00 Hrs. to 09.05.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 09.05.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **10.05.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No :- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ Tender-19/2022-23 Dtd. 02.05.2022** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for AMC of Tree cutting & chopping in hilly and dense forest area at various 220 kV/100 kV D/C on D/C,S/C on D/C & S/C on S/C EHV Lines under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad | **Rs. up to 12,09,558/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 03.05.2022 @ 00:00 hrs. to 09.05.2022 @ 23:59 Hrs. for above tender
for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**



**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | फ्युचर बिल्डकॉन तर्फे भागीदार श्री. देवराज रावरीया, प्लॉट नं.४ ए, से-११, खांदा कॉलनी, न्यु पनवेल. | ०८ पाम व ०८ जंगली अशी एकुण १६ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.४ ए, से- ११, खांदा कॉलनी, न्यु पनवेल येथे नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी वृक्षतोड करण्याची परवानगी मिळावी.. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या । काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१ २२/प्र.क्र.३४/२०६/२०२२
दिनांक :-०२/०५/२०२२

सही/-
सहा आयुक्त
तथा
वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका






**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. ३ मे २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी कल्ब, नवीन पनवेलम, सेक्टर-१९ ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामिण लसीकरण**

■ काळुंद्रे ■ तळोजा ■ असुडगाव ■ पालेखुर्द ■ रांजणपाडा/पेठ ■ धानसर/तुर्भे

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे.
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन ॲप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

# उरणमध्ये 'बीएमएस'चे त्रैवार्षिक अधिवेशन

## आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांचे मार्गदर्शन




**उरण : वार्ताहर**

भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाचे (बीएमएस) १०वे त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशन ३० एप्रिल ते १ मेदरम्यान जेएनपीटीच्या कामगार संघटना बहुउद्देशीय सभागृहात भरविण्यात आले. या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवारी महासंघाचे राष्ट्रीय सचिव रवींद्र हिमते यांच्या हस्ते झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, स्वागताध्यक्ष म्हणून आमदार महेश बालदी, भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाचे (बीएमएस) राष्ट्रीय सचिव रवींद्र हिमते, महासंघाचे महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी मोहन येणूरे, विशाल मोहिते, आयोजक भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत, जेएनपीटी वर्कर्स युनियनचे अध्यक्ष बी. के. ठाकूर, जनरल सेक्रेटरी रवींद्र पाटील, जेएनपीटी जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाच्या कार्याचे कौतुक केले. कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महासंघाचा कायमच पुढाकार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आमचे कायम प्राधान्य असून अधिवेशनासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

आमदार महेश बालदी यांनी, विविध बंदरातील संघटित, असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षितता व नोकऱ्या टिकवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कामगारांना कामगार कायद्यानुसार सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचीही भूमिका आमदार महेश बालदी यांनी मनोगतातून मांडली, तर देशातील विविध बंदरात काम करणाऱ्या हजारो कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा द्यावा लागेल यासाठी कामगारांनी एकत्र येऊन संघर्षासाठी सज्ज व्हा, असे आवाहन भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाचे (बीएमएस) राष्ट्रीय सचिव रवींद्र हिमते यांनी केले.

या वेळी संघटनेचे क्षेत्रीय संघटनमंत्री सी. व्ही. राजेश, राष्ट्रीय उपाध्यक्ष जगदिश्वर राव, इंडस्ट्री अ‍ॅण्ड पोर्ट विभागाचे प्रभारी चंद्रकांत धुमाळ, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल ढुमणे, भवानी शंकराडू यांनीही मार्गदर्शन केले. अधिवेशनात बंदराचे खासगीकरण, नवीन कायदे, कंत्राटी कामगारांच्या समस्या, जॉब सिक्युरिटी, विविध बंदरातील स्थानिक समस्यांवर चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले. त्यानंतर पुढील तीन वर्षांसाठी संघटनेची नव्याने कार्यकारिणीची निवड करण्यात आली.




पनवेल : महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा नावडे शहर व मैत्री प्रतिष्ठान यांच्या वतीने उत्सव महाराष्ट्राचा, संस्कृती महाराष्ट्राची हा बहारदार संगीतमय कार्यक्रम तसेच विशेष सन्मान पुरस्कार सोहळा रविवारी रंगला. या सोहळ्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची उपस्थिती लाभली. आयोजकांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत आणि सन्मान करण्यात आला.

## कळंबोलीमधून तरुण, तरुणी बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तरुण व तरुणी बेपत्ता झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. जेडब्ल्यूएल ओल्ड स्टोरेज येथून एक २६ वर्षीय तरुण निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शीबा हेटा बोरो असे या तरुणाचे नाव असून उंची ५.५ फूट, रंग गोरा, दाढी बारीक, उजव्या हाताच्या मनगटावर एस हे इंग्रजी अक्षर गोंदलेले आहे. अंगात काळी बनियन व हाफ पॅन्ट घातली आहे, तर एक २० वर्षीय तरुणी कोणास काही न सांगता निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात नातेवाईकांनी दिली आहे. प्रतीक्षा दोलताडे हिचा रंग गोरा, उंची ५.५ इंच, अंगात पिवळा कुर्ता व पांढरी लेगीन्स घातली आहे तसेच पायात चप्पल व पैंजण घातलेली आहे.




पनवेल : महाराष्ट्र दिनानिमित्त कुंभारवाडा युवक मंडळाच्या वतीने आयोजित सत्यनारायण महापुजेला महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, कुंभारवाडा युवक मंडळाचे अध्यक्ष रितेश पवार, खजिनदार राजेश परदेशी, सचिव रुपेश तळोजकर, परेश शेट्ये उपस्थित होते. मंडळाच्या वतीने परेश ठाकूर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



पनवेल : भारतीय माथाडी कामगार संघटनेचे रायगड उपाध्यक्ष रामदास महानवर यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली येथे कार्यक्रम झाला. या ठिकाणी महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी महिला व बालकल्याण सभापती तथा विद्यमान नगरसेविका मोनिका महानवर, प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, भाजप कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, बबन बरगजे, अशोक मोटे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## 'सुखम्'च्या दशकपूर्तीनिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलसह करंजाडे आणि कर्जत येथील रुग्णांना अहोरात्र तसेच प्रामाणिक सेवा देणाऱ्या सुखम् हॉस्पिटलचा दशकपूर्ती सोहळा शुक्रवारी (दि. ६) क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात साजरा होणार आहे.

या सोहळ्याचे औचित्य साधून सुखम्चे संस्थापक डॉ. दिपाली आणि संतोष जाधव यांच्या अनुभवांची गाथा असलेले 'झुंज सुखम्ची कोरोनाशी' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, तसेच कोरोना काळात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या कोरोना योद्ध्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमानिमित्त मनोरंजनाची पर्वणीदेखील उपस्थितांना लाभणार आहे. या कार्यक्रमाला वैद्यकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी निमंत्रितांनाच प्रवेश देण्यात येणार असून इच्छुकांनी प्रवेशिकेसाठी सुखम्चे प्रशासकीय अधिकारी मच्छिंद्र जाधव यांच्याशी (९९८७७२९९८८) संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवीन पनवेल शांतिनिकेतन स्कूलच्या प्रवेशद्वारावरील गटारावर बसवली झाकणे

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या प्रवेशद्वारासमोरील गटारावरील झाकण तुटल्याने मोठा खड्डा पडला होता. या खड्ड्यात पाय घसरून विद्यार्थी पडल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याचर तक्रार होताच सिडकोने त्या खड्ड्यावर तातडीने झाकणे बसवल्याने पालकांनी नि:श्वास सोडला.



नवीन पनवेल सेक्टर २मध्ये शांतिनिकेतन पब्लिक स्कूल आहे. या शाळेच्या प्रवेशद्वारावर फुटपाथखाली तीन ते चार फूट खोल गटार आहे. या गटारावरील स्लॅब पडल्याने त्याठिकाणी मोठा खड्डा पडला होता. त्यामध्ये बाटल्या, दगड आणि लोखंडी सळ्यांचे तुकडे आहेत. त्याच्यावर शाळेने एक प्लायवूडचा तुकडा टाकून ठेवला होता. विद्यार्थी त्याच्यावरून जाताना प्लायवूड तुटल्यास किंवा त्याच्या गॅपमध्य एखाद्या मुलाचा पाय गेल्यास अपघात होण्याची शक्यता होती. याबाबत आरपीआयचे नवीन पनवेल शहराध्यक्ष अंकुश साळवे, उपाध्यक्ष संपत भोजने व पंचशील झोपडपट्टीचे अध्यक्ष पप्पू साळवे यांनी त्याचा पाठपुरावा सुरू केला होता. शाळेनेही महापालिकेला आणि सिडकोला पत्र दिले होते. सिडकोचे एईई संतोष साळी यांची भेट घेऊन त्यांना फोटो दाखवल्यावर त्यांनी ताबडतोब ठेकेदाराला काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. ते काम पूर्ण झाल्याने पालकांनी त्यांना धन्यवाद दिले.

**शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या गेटवर पडलेला खड्डा धोकादायक होता. त्याबाबत आपल्या प्रतिनिधीने माझी भेट घेतल्यावर ठेकेदाराला ते काम ताबडतोब करून देण्याचे व त्या गटारातील कचराही साफ करण्यास आदेश दिले.**

**–संतोष साळी, एईई, सिडको**

## कंटेनर टॉयलेटच्या ठिकाणी जास्त क्षमतेच्या टाक्या उभारा

### नगरसेविका दर्शना भोईर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १९मध्ये महापालिकेमार्फत अनेक ठिकाणी कंटेनर टॉयलेट उपलब्ध करण्यात आले आहेत. या ठिकाणी ५००० लिटर क्षमतेच्या काँक्रिटच्या पाण्याच्या टाक्या उभारण्याची मागणी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी प्रभाग क्रमांक १९मध्ये महापालिकेमार्फत अनेक ठिकाणी कंटेनर टॉयलेट उपलब्ध करण्यात आले आहेत. या कंटेनर टॉयलेटच्या पाण्याची टाक्यांची क्षमता कमी असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या ठिकाणी महापालिकेने ५००० लिटर क्षमतेच्या काँक्रिटच्या टाक्यांची उभारणी करण्याची मागणी करणारे निवेदन नगरसेविका दर्शना भोईर यांनी महापालिका आयुक्तांना सादर केले आहे.

# नगरसेवक राजू सोनी यांचा कुंभारवाडा युवक मंडळातर्फे सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांनी आतापर्यंत सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या विविध कार्याची दखल कुंभारवाडा युवक मंडळाने घेऊन त्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार केला.

१ मे कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कुंभारवाडा युवक मंडळातर्फे सत्यनारायण महापुजा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी तेथे नगरसेवक राजू सोनी यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी कुंभारवाडा युवक मंडळाचे अध्यक्ष रितेश पवार, खजिनदार राजेश परदेशी, सचिव रुपेश तळोजकर, परेश शेट्ये आदी मान्यवर उपस्थित होते.




## बबन फराड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवानिवृत्त होऊन सहवास सुटला म्हणजे सोबत काही सुटत नाही. रोजच्या आयुष्यात खूप माणसे येतात अन् जातात, पण बबन फराड यांच्यासारखी माणसे मात्र कायमची मनात राहतात असे गौरवोद्गार भाजप रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष व जि. प. सदस्य एकनाथ देशेकर यांनी काढले. बबन फराड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कार्यक्रमात चिंध्रण येथे ते बोलत होते.

बबन फराड यांनी ३६ वर्षे भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड या कंपनीत सेवा दिली. चिंध्रण येथील त्यांच्या घरापासून बबन फराड व त्यांच्या पत्नी यांना रथात बसवून मिरवणूक काढण्यात आली. त्यांचा यथोचित सत्कार व गौरव एकनाथ देशेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

# गावदेवीच्या यात्रेनिमित्त कळंबुसरे येथील तलावात सामुदायिक मासेमारी

**उरण : प्रतिनिधी**

गावदेवी देवतांची यात्रा म्हणजे गावातील जनतेच्या आनंदाला उधाण रायगड जिल्ह्यात यात्रेनिमित्त घरोघरी खास बेत केला जातो. तालुक्यातील कळंबुसरे येथे बापूजीदेव यात्रेनिमित्त रविवारी (दि. १) सामुदायिक मासेमारी करण्यात आली.

सामुदायिक मासेमारीची परंपरा वर्षानुवर्षे या गावांमध्ये अजूनही टिकून ठेवलेली आहे. आदल्या दिवशी गावामध्ये दवंडी देऊन गावकऱ्यांना सूचित केले. दुसऱ्या दिवशी गावकरी एकत्रित येऊन सामुहिक मासेमारी केली जाते. पहिल्या पावसाळ्यात म्हणजे जून महिन्यात गावच्या तलावात गावकीतर्फे छोटे मासे सोडविले जातात. माशांना मोठे होण्यासाठी पोषक असे खाद्य ही टाकले जाते. साधारणपणे नऊ ते दहा महिन्यांत म्हणजे गावदेवी देवतांच्या यात्रेपर्यंत हे मासे मोठे झालेले असतात. या माशांमध्ये चिलापी, कटला, जिताडा आदी मासळीचा समावेश असतो.

यात्रेच्या दिवशी गावामध्ये दवंडी मारल्याप्रमाणे सकाळी लवकर गावातील लोक तलावाजवळ एकत्र होतात.

तलावात मासे पकडण्याचे जाळे म्हणजे आसू घेऊन तलावात उतरतात यामध्ये मोठमोठी जाळे म्हणजे आसू प्रत्यकाचे असते. यालाच तळा मारणे म्हणतात. कोरोनामुळे दोन वर्षे सर्व बाबींवर निर्बंध करण्यात आले होते, परंतु आता निर्बंध उठल्याने यात्रा मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जात आहेत.




## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**

***अ.*** नटराजन चंद्रशेखरन ***आ.*** राकेश झुनझुनवाला
**इ.** रमेश दमाणी **ई.** नंदन निलकेणी

**२. एलआयसीच्या आधी भारतातील सर्वात मोठा आयपीओ कोणता होता?**

***अ.*** कोल इंडिया ***आ.*** रिलायन्स पॉवर
**इ.** पेटीएम **ई.** एसबीआय कार्ड

**३. घर, ऑफिस किंवा १९० देशांमध्ये प्रवास करतानाही कर्मचारी काम करू शकतील, अशी परवानगी देणाऱ्या कंपनीचे नाव काय?**

***अ.*** एअर बीएनबी ***आ.*** गुगल
**इ.** फेसबुक **ई.** मायक्रोसॉफ्ट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# तोफा धडाडल्या!

राज्यात सध्या उष्णतेचा पारा चढत असताना राजकीय वातावरणही तापले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करीत चलो अयोध्याचा नारा दिला आहे. त्यांनी महाराष्ट्र दिनी औरंगाबादमध्ये झालेल्या सभेत भोंग्यांच्या विषयाचा पुनरूच्चार केला, तर दुसरीकडे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राजधानी मुंबईतील सभेत बाबरी मशीद पतनावरून सत्ताधारी शिवसेनेवर शरसंधान साधले.

**प्रखर हिंदुत्ववादी म्हणून ओळखली जाणारी शिवसेना ही पक्षसंघटना काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेससोबत राज्याच्या सत्तेवर बसल्यावर मात्र आपली भूमिका बदलताना दिसत आहे. नेमके हेच हेरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करीत नवी इनिंग सुरू केली आहे. औरंगाबादमध्ये रविवारी झालेल्या सभेत राज ठाकरेंनी पुन्हा एकदा मशिदींवरील भोंग्यांचा मुद्दा अधोरेखित केला. सरळ सांगून भोंगे निघणार नसतील तर मग होऊन जाऊ द्या एकदा, असे म्हणत दुप्पट आवाजात मशीदींसमोर हनुमान चालिसा वाजविण्याची भूमिका या वेळी राज ठाकरे यांनी जाहीर केली. ते म्हणाले, लाऊडस्पीकर हा विषय धार्मिक नसून सामाजिक आहे, पण जर तुम्ही त्याला धार्मिक रंग देणार असाल, तर त्याला आम्ही तसेच उत्तर देऊ. देशातील सर्व लाऊडस्पीकर खाली आले पाहिजेत. सर्वांना समान धर्म असला पाहिजे, असे सांगत जर उत्तर प्रदेशात भोंगे उतरवले जाऊ शकतात, तर महाराष्ट्रात का नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या वेळी त्यांनी मशिदींवरील अनधिकृत भोंगे उतरवण्यासाठी ३ मेपर्यंतची डेडलाईन देतो, अन्यथा दुसऱ्या दिवशीपासून मशिदींसमोर मनसेकडून हनुमान चालिसा लावण्यात येईल, असा इशाराही दिला. या सभेत राज यांनी आपल्या आगामी दौऱ्यांबाबत भाष्य करीत आपण यापुढील सभा मराठवाडा, विदर्भ, कोकण तसेच पश्चिम महाराष्ट्रात घेणार आहोत, असे जाहीर केले. राज यांनी ५ जून रोजी अयोध्या दौरा करण्याचे घोषित केले आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यभर सभा घेऊन वातावरण निर्मिती करण्याचा त्यांचा मानस दिसतो. राज यांची औरंगाबादमधील सभा सुरू होण्यापूर्वी माजी मुख्यमंत्री आणि विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत सभा घेऊन आगामी महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडून रणशिंग फुंकले. या वेळी त्यांनी बाबरीचे पतन झाले, तेव्हा आपण तिथे उपस्थित असल्याचे सांगून कारसेवक म्हणून १८ दिवस तुरुंगामध्ये होतो, असेही म्हटले. बाबरी ही मशीद नव्हती. परकीय आक्रमणाचा तो ढाचा होता. तो पाडण्यासाठी मी स्वत: तेथे होतो. बाबरी पाडल्याबद्दल ज्या ३२ जणांना आरोपी केले होते त्यात महाराष्ट्रातील शिवसेनेच्या एकाही नेत्याचा समावेश नाही. ते सर्व भाजपचे नेते होते, असेही फडणवीस यांनी नमूद करीत शिवसेनेवर हल्लाबोल केला. मशिदींवरील भोंगे काढायची यांची हिंमत नाही आणि म्हणतात बाबरी मशीद आम्ही पाडली. ज्यांनी राम मंदिराला विरोध केला त्यांच्याच मांडीला मांडी लाऊन उद्धव ठाकरे सत्तेत बसले आहेत. राज्यात आता हनुमान चालिसा म्हटले की, राजद्रोहाचा गुन्हा दाखल होतो. मग तुम्ही कुणाच्या बाजूचे आहात रामाच्या की रावणाच्या, असा सवाल त्यांनी ठाकरे यांना उद्देशून केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे १४ मे रोजी सभा घेऊन आपली भूमिका मांडणार आहेत. त्यामुळे फडणवीस यांनी त्यानंतर सभा घेण्याची घोषणा या वेळी केली. त्यामुळे आगामी काळात राजकीय वातावरणही गरम असेल असे दिसते.**

# पोर्तुगीज राजवटीतील कोर्लईचे माऊंट कार्मेल चर्च



प्राचीन काळात व्यापारी बंदर म्हणून प्रसिध्दीस असलेल्या चौलमध्ये पोर्तुगिजांनी सन १५०५ मध्ये व्यापाराच्या निमित्ताने प्रवेश केला. चौल व रेवदंडासह कोर्लई या भागावर पोर्तुगिजांचे वर्चस्व होते. कोर्लई किल्ला निजामाच्या ताब्यातून हिसकावून घेत सन १५९४ मध्ये कोर्लई किल्ला काबीज केला. कुंडलिका समुद्र खाडीत प्रवेश करणाऱ्या जहाजावर लक्ष्य ठेवणे कोर्लईच्या टेकडी किल्लावरून सोपे जात असे. या सगळ्या घडामोडीत पोर्तुगिजांची वस्ती कोर्लई भागात होऊ लागली. पुढे स्थानिक व पोर्तुगीज यांच्यातील संवादासाठी नॉ लिंग भाषेची निर्मिती झाली. या भाषेला कोर्लई क्रिओल पोर्तुगीज असेही म्हटले जाते. सध्या कोर्लई गावाच्या एका बाजूस टेकडीच्या छायेत ख्रिश्चन बांधवाची लोकवस्ती आहे. कोर्लई येथे ख्रिश्चन बांधवाचे प्रार्थनास्थळ माउंट कार्मेल चर्च दिमाखाने उभे आहे.

कोर्लईमधील ख्रिश्चन बांधवाचे प्रार्थनास्थळ असलेले माऊंट कार्मेल चर्च सन १७१३ मध्ये बांधले गेल्याचे लिखीत आहे. दिडशे वर्ष चौलमध्ये सत्ता उपभोगल्यानंतर मराठ्यांशी झालेल्या युध्दात पराभव पत्करावा लागल्याने पोर्तुगीज व मराठे यांच्या तहानुसार सन १७४० मध्ये पोर्तुगीज येथून निघून गेले. सन १७१३ साली बांधले गेलेले कोर्लई येथील माउंट कार्मेल चर्च हे पोर्तुगीज काळातील असल्याचे स्पष्ट होते.

अलिबागपासून २२ किमी व रेवदंडा येथून चार किमी अंतरावर मुरूड तालुक्यात येत असलेले कोर्लई या ख्रिश्चन पाड्याच्या शेजारी तिनशे वर्षापुर्वी बांधलेले व पोर्तुगीज काळाची आठवण देणारे माउंट कार्मेल चर्च आहे. पोर्तुगीज काळापासून विशिष्ट नॉलिंग (कोर्लई क्रिओल) भाषेत संवाद करीत असलेले ख्रिश्चन बांधव व येथील माउंट कार्मेल चर्च हे कोर्लई मधील ऐतिहासिक वारसा आहे. कोर्लई गावात आगरी, कोळी, मराठा, या प्रमुख जातीसह ख्रिश्चन बांधवाची सुध्दा वस्ती आहे. कोर्लईच्या ख्रिश्चन पाड्यात २३५ घरे असून १,२०० लोकसंख्या ख्रिश्चन बांधवाची आहे. या ख्रिश्चन पाड्यात रोजारिओ, डिसुजा, परेरा, मार्तीस, रॉड्रिक्स, वेगास, रोचा, पेना आणि गोम्स ही प्रमुख सात घराणी तसेच गोवा व दिव-दमणमधून आलेली काही कुंटूबे येथे वास्तव्यात आहेत. कोर्लई मधील ख्रिश्चन बांधव प्रामुख्याने शेती, भाजीपाला तसेच मासेमारी हा व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात.

काळाच्या ओघात कोर्लई मधील ख्रिश्चन पाड्यातील ख्रिश्चन बांधव मुंबई, पुणे, ठाणे, अलिबाग, रोहा, पनवेल, उरण, आदी भागात कामानिमित्त स्थळांतरीत झाले. मात्र कोर्लईच्या माउंट कार्मेल चर्च व कोर्लई ख्रिश्चन पाडा यांचेशी ऋणानबंध अद्यापी ठेवून आहेत.

साळाव येथून मुरूडकडे जाताना कोर्लईच्या मुख्य रस्त्याच्या उजव्या बाजूस कोर्लई ख्रिश्चन पाड्याच्या बाजूस भव्य व पक्के बांधकामाचे माउंट कार्मेल चर्च आहे. या मांउट कार्मेल चर्चच्या बाजूलाच मांउट कार्मेल हायस्कुल आहे. सध्या माउंट कार्मेल चर्चमध्ये मुंबईतील फादर जो. बार्जेस हे कार्यरत आहेत. मुंबई-कार्डिनलच्या आर्च बिशपच्या वतीने फादर जो.बार्जेस यांची नेमणूक करण्यात आली आहे. कोर्लई माउंट कार्मेल चर्चमध्ये कायमस्वरूपी फादरची नेमणूक सन १८४५ पासून होवू लागली. पहिले निवासी फादर म्हणून थीम द रूझारिओ यांनी सलग वीस वर्ष काम पाहिले. सन १८४५ पुर्वी कोर्लई माउंट कार्मेल चर्चची व्यवस्था मुंबई-कार्डिनल आर्च बिशप मधून होत असे. चर्चमध्ये फादरची नेमणुक तीन वर्ष, सहा वर्ष गरजेनुसार तसेच कायमस्वरूपी सुध्दा केली जाते. कोर्लई माउंट कार्मेल चर्च मुंबई विभागातील ११० चर्चमध्ये समाविष्ट आहे.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

### विविध सामाजिक उपक्रम

*२५ डिसेंबर रोजी कोर्लई येथे माउंट चर्चमध्ये नाताळ सण व नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने ख्रिश्चन बांधव करीत असतात. नाताळ सणाच्या निमित्ताने नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने विखुरलेले ख्रिश्चन समाज बांधव कोर्लई येथे एकत्रीत येतात. या निमित्त कोर्लई माउंट कार्मेल चर्चला रंगरंगोटी करण्यात आली असून विशेष प्रार्थना व पारंपरीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी पारंपरिक ख्रिस्तांच्या जन्माचे गोठे उभारण्यासाठी पर्यावरण हा विषय ठेवण्यात आला आहे. वृक्षतोड, अतिवृष्टी आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास आदी विषयावर या ख्रिस्त जन्माच्या गोठ्यामधून पर्यावरण जनजागृतीचा उद्देश युवावर्गाला स्पर्धे च्या माध्यमातून देण्यात येत आहे, असे कोर्लई माउंट कार्मेल चर्चचे फादर जो. बार्जेस यांनी सांगितले.*

---




इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिन्याला प्रारंभ होतो. हा महिना इस्लाम धर्मियांत अत्यंत पवित्र महिना समजला जातो. यावर्षी २ एप्रिल रोजी सायंकाळी चंद्रदर्शन झाल्यावर रमजान महिन्याला सुरुवात होऊन दि.३ एप्रिलपासून पवित्र रमजान महिन्याचे रोजे (उपवास) सुरु झाले. गेली दोन वर्षे रमजान महिन्यात कोरोना महामारीचे संकट असल्याने कोविड नियमांचे पालन करीत मुस्लिम बांधवानी रोजा, कुराण पठण व नमाज अदा केली.

इस्लाम धर्मांत ईमान(अल्लाहावर श्रद्धा), नमाज, रोजा, जकात, हज ही पाच मूलभूत तत्त्वे मानली जातात. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजा, कुराण पठण व नमाज(प्रार्थना) भक्तिभावाने करून अल्लाहाची इबादत करीत असतात. या महिन्यात वातावरण अत्यंत प्रसन्न असते. अगदी लहानांपासून सशक्त असणारे वयोवृद्ध रमजानचे रोजे एकाग्रतेने करीत असतात. पहाटेच्या बांगी अगोदर काही तरी थोडेफार खाऊन रोजा धरला जातो. नंतर दिवसभर अन्न, पाणी विना मुस्लिम बांधव हा रोजा (उपवास) धरीत असतात. सायंकाळी मगरीबच्या बांगीबरोबर हा रोजा सोडला जातो. त्यानंतर मगरीब व इशाची नमाज होते. इशाची नमाज झाल्यानंतर रमजानच्या एक महिना मुस्लिम बांधव तरविहची नमाज अदा करतात. या महिन्यात मुस्लिम बांधवांचा जकात (दानधर्म) यावर जास्त भर असतो. आपल्या नात्यातील कुणी गरीब असेल किंवा अन्य कोणा गरीबाला या महिन्यात जकात दिली जाते. महिनाभर भक्तिभावाने अल्लाहाची इबादत केली जाते. यानंतर महिन्यांनी रोजे पूर्ण झाल्यावर दुसऱ्या दिवशी रमजान ईद साजरी केली जाते. यादिवशी मुस्लिम बांधवांच्या घरी शिरखुर्मा हे गोड पेय बनविले जाते. आज रमजान ईद आहे. या ईदची नमाज मुस्लिम बांधव सकाळी ईदगाह अथवा मशिदीमध्ये अदा करीत असतात पण कोरोना संकटामुळे गेली दोन वर्षे मुस्लिम बांधवांना घरातूनच ईदची नमाज अदा करावी लागली. ही नमाज झाल्यावर मुस्लिम बांधव एकमेकांना गळा भेट आलिंगन देऊन ईदच्या शुभेच्छा देतात. पण यावेळेस जगावरील कोरोनाचे संकट जवळपास टळल्याने शासनाने सार्वजनिक कार्यक्रम व उपक्रम यावरील निर्बंध उठविले असल्याने यावर्षी रमजान ईद अत्यंत उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

**-सलीम शेख, माणगाव**


---



## बदलते तंत्रज्ञान

### सावधान, युजर्सचा डेटा होतोय सार्वजनिक!

गुगल प्ले स्टोर आपल्या युजर्ससाठी एक नवे आणि महत्त्वपूर्ण फीचर घेऊन आले आहे. गुगल प्ले स्टोरच्या आधी, अ‍ॅप्पलने त्याच्या प्ले स्टोरवर असेच एक फीचर आणले होते. गुगल प्ले स्टोर आपल्या युजर्ससाठी एक नवे आणि महत्त्वपूर्ण फीचर घेऊन आले आहे. हे फीचर वापरकर्त्यांना कोणतेही अ‍ॅप डाउनलोड करताना, या अ‍ॅपद्वारे कोणती माहिती संकलित केली जात आहे, हे सांगणार आहे. गुगल प्ले स्टोरच्या आधी, अ‍ॅप्पलने त्याच्या प्ले स्टोरवर असेच एक फीचर आणले होते, जे प्रायव्हसी न्यूट्रिशन लेबनसारखे होते. गुगल प्ले स्टोअरचे डेटा सेफ्टी सेक्शन फीचर फक्त अँड्रॉइड यूजर्ससाठी आहे. यासाठी गुगलने सर्व अ‍ॅप डेव्हलपर्सना २० जुलै २०२२ पर्यंत डेटा सुरक्षा सेक्शन पूर्ण करण्यास सांगितले आहे. दुसरीकडे, ज्या अ‍ॅप्ससाठी तुम्हाला डेटा सेफ्टी सेक्शन अद्याप दिसत नसेल, तर ते येणाऱ्या काही आठवड्यात दिसायला लागतील.




अ‍ॅप डेव्हलपर्सना सूचना देताना गुगलने म्हटले आहे की, अ‍ॅपच्या कामामध्ये कधी काही बदल झाला असेल तर ते डेटा सेफ्टी सेक्शनमध्येही अपडेट करावे लागेल, जेणेकरून युजर्सना अ‍ॅपमधील बदलांची पूर्ण माहिती असेल. गुगलने आपल्या ब्लॉग पोस्टमध्ये लिहले की, वास्तविक युजर्सना हे जाणून घ्यायचे आहे की त्यांचा डेटा कोणत्या उद्देशाने गोळा केला जात आहे आणि डेव्हलपर्स त्यांचा हा डेटा तृतीय पक्षांसोबत तर शेअर करत नाहीत ना? याशिवाय, युजर्सना हे देखील समजून घ्यायचे आहे की, अ‍ॅप डाउनलोड केल्यानंतर अ‍ॅप डेव्हलपर्स त्यांचा डेटा कसा सुरक्षित करत आहेत. म्हणूनच आम्ही डेटा संरक्षण विभाग तयार केला आहे, जेणेकरून डेव्हलपर्स स्पष्टपणे सांगू शकतील की कोणता डेटा गोळा केला जात आहे आणि कोणत्या उद्देशाने?

तसेच गुगलने अँड्रॉइड १२ सह प्रायव्हसी फीचर्समध्ये अनेक प्रभावी बदलांची घोषणा केली होती. गुगल प्ले स्टोरवर आणलेला हा नवीन डेटा सुरक्षा विभाग देखील युजर्सची डेटा प्रायव्हसी अधिक सुधारण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. अँड्रॉईड १२ च्या युजर्सना अ‍ॅपतर्फे स्मार्टफोनच्या वरच्या कोपऱ्यात कॅमेरा आणि माईक दिसेल, जे सांगेल की, डिव्हाइस कॅमेरा आणि माईक वापरत आहे किंवा नाही.

---

# चित्रतपस्वी भालजी पेंढारकर




भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणार्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. त्यांचा जन्म ३ मे १८९८ रोजी कोल्हापुरात झाला. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले. भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले.

कोल्हापूर शहरास धार्मिक, राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक इतिहास आहे तसा सांस्कृतिक इतिहासही समृध्द आहे. चित्रकला, शिल्पकला, संगीत. साहित्य, रंगभूमी याबरोबरच चित्रपट यांचे या इतिहासात मोठे योगदान आहे. सामाजिक जडणघडणीत कलामाध्यमातुन सांस्कृतिकता आणि संस्कृती घडत जाते. ती घडविणाऱ्या अनेक कलावंत, तंत्रज्ञांच्या कार्यकर्तृत्त्वानेच कोल्हापुरला कलापूर असे नामविधान प्राप्त झाले. याचे पुर्वश्रेय राजश्री छत्रपती शाहु महाराज यांच्याकडे जाते. त्यांची रसिकता व प्रोत्साहन यामुळे या भुमीत जे अनेक कलावंत घडले, त्या अग्रणींपैकी चित्रतपस्वी स्व.बाबा तथा भालजी पेंढारकर हे एक महत्त्वपुर्ण नाव आहे. त्यांनी आपल्या दीर्घायुषी जीवनात देव, देश आणि धर्म ही त्रिसुत्री जपली. विचारवंत, तत्त्वज्ञ, राष्ट्रभक्त कलावंत या नात्याने त्यानी निर्माण केलेल्या सर्व चित्रपटांतुन आपल्या त्रिसुत्री विचारप्रणालीद्वारे सातत्याने समाज प्रबोधन विचार, संस्कार आणि शिक्षण हे मनोरंजनाच्या माध्यमातुन दिले. तो सर्व ठेवा सांस्कृतिक वारसा आहे. त्यांचे संवर्धन, संरक्षण करीत भावीपिढी सजनशील, सजनशील, क्रीयाशील व संस्कारक्षम घडावी या भुमिकेतुनच भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

पुण्यातल्या 'लक्ष्मी' थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यात अभिनयही केला. भालजी पेंढारकरांच्या बोलपटांच्या सुरुवातीलाच 'बहु असोत सुंदर', 'आकाशवाणी' (१९३४), 'पार्थकुमार' (१९३४), 'कालियामर्दन' (१९३५), 'सावित्री' (१९३६) अशी सुरू झालेली त्यांची कारकीर्द 'नेताजी पालकर' (१९३९), 'थोरातांची कमळा' (१९४१), 'वाल्मिकी' (१९४६), 'मीठभाकर' (१९४९), 'छत्रपती शिवाजी' (१९५२), 'गाठ पडली ठका ठका' (१९५६), 'मोहित्यांची मंजुळा' (१९६३) अशी वळणे घेत गेली. 'साधी माणसं' (१९६५), 'गनिमी कावा' (१९८१) आणि शेवटचा शाब्बास सूनबाई (१९८६) असे तब्बल पंचेचाळीस चित्रपट त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले. या चित्रपटांत ते दिग्दर्शन-कथा-पटकथा-संवाद किंवा निर्मिती या नात्याने कार्यरत होते. अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षींचे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी निधन झाले.

---




**क्लिक...क्लिक...!**

**श्रीवर्धन : तापमानाचा पारा चाळीशीपार गेला आहे. तो पन्नासी पार करेल असा अंदाज व्यक्त होत आहे. सगळीकडे उष्म्याने नागरिक हैराण झाले आहेत. अंगाची लाही लाही होत आहे. अशा स्थितीत सूर्य अस्ताला जाताना समुद्र किनारी मात्र वातावरण थंड आणि आल्हाददायक वाटत असते.**

(छाया : अमेय नाझरे)

---



## आरोग्य प्रहर

### ॲसिडिटी होत असेल तर 'हे' पदार्थ खाऊ नका!

आपल्या जठरात आम्ल असतेच. खाल्लेल्या अन्नाचे विघटन करणे, अन्नातील विषाणूंना मारणे आणि अन्नातील सर्व घटक एकत्र करून ते पचनसंस्थेत पुढे सरकण्यास मदत करणे हे त्या आम्लाचे नेहमीचे काम. जठरातील आम्लाचे उत्पादन वाढून जो त्रास होतो, तो म्हणजे ॲसिडिटी. यात जळजळ होणे, पोटात दुखणे ही लक्षणे दिसू शकतात. हे पोटात दुखणेही जळजळ झाल्यासारखे दुखते किंवा तीव्र दुखते.

ॲसिडिटीत पोटात तीव्र दुखत असेल तर जठराच्या आतील अस्तर उघडे पडून तिथे अल्सर (व्रण) झालेला असू शकतो. खरे तर जठराचे आतले आवरण मजबूत असते. आम्ल सहन करण्याची क्षमता त्यात असूनही काही वेळा ते अशा प्रकारे फाटू शकते. असा अल्सर होतो तेव्हा त्या ठिकाणच्या नसा उघड्या पडतात आणि त्यावर आम्लाची प्रक्रिया होऊन पोटात दुखते. अनियमित जेवण हे ॲसिडिटीचे मुख्य कारण आहे. ॲसिडिटीमुळे डोकेदुखी, कंबर दुखी, पोटदुखी, छातीत जळजळ सारख्या समस्या निर्माण होतात. ज्यांना सिडिटीचा त्रास होतो, त्यांनी काही गोष्टी टाळाव्यात खाण्यापिण्याचा परिणाम थेट आपल्या आरोग्याशी निगडित असतो. आपण खाण्यापिण्यात खूप काळजी घेतली पाहिजे, कारण याचा थेट परिणाम आपल्या पचनक्रियेवर होतो. ज्यांना ॲसिडिटीचा त्रास होतो, त्यांनी हे पदार्थ टाळणे गरजेचे आहे.

राजमा चावल-हे असे कॉम्बिनेशन आहे की, लोकांना अनेकदा जेवणात खायला आवडते. पण जर तुम्हाला नेहमी ॲसिडिटी होत असेल तर तुम्ही राजमाचे सेवन करू नये. राजमाचे जास्त सेवन आपल्या पचनसंस्थेसाठी हानिकारक असू शकते. चणे-राजमाप्रमाणे छोलेचे सेवन करू नये. राजमाप्रमाणेच चण्यामुळे ॲसिडिटी होण्याचा धोका जास्त असतो.

मुळा-हा सहसा हिवाळ्यात मिळतो, पण आता तो प्रत्येक ऋतूत असतो. जर तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असेल तर तुम्ही मुळांपासून दूर राहावे. मुळ्याच्या सेवनाने आपल्या पोटात गॅस निर्माण होतो, त्यामुळे ॲसिडिटी झाल्यास मुळ्याचे सेवन करू नये. फणस-जॅकफ्रूट अनेक प्रकारे खाल्ले जाऊ शकते. कुठे त्याची भाजी बनवली जाते तर कुठे लोणच्यात वापरली जाते. जॅकफ्रूट हे शाकाहारी लोकांसाठी मांसाहाराची मेजवाणी असल्याचे म्हटले जाते. जरी फणसात भरपूर पोषक तत्वे असतात, पण त्यामुळे पोटात गॅसही वाढतो. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास असणाऱ्यांनी फणसाचे सेवन करू नये. अळू-ही भाजी आपण खूप आवडीने खातो. मात्र ही भाजी देखील समस्या वाढवू शकते ही भाजी जास्त प्रमाणात खाल्ल्यास ॲसिडिटी होऊ शकते, मात्र ॲसिडिटीचा त्रास असलेल्यांनी त्याचे सेवन टाळावे.

# लाकडाची अनधिकृत वाहतूक रोखली

## महाड वन विभागाची कारवाई; दोघांवर गुन्हा दाखल



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

बेकायदेशीर वृक्षतोड करुन लाकडाची अनधिकृत वाहतूक करणारी गाडी महाड वन विभागाने ताब्यात घेतली असून या प्रकरणी वाहतूक करणारा ट्रक आणि लाकडे जप्त करण्यात आली आहेत.

गुप्त माहितीनुसार आकेशिया जातीची वृक्षाची विनापरवाना तोड करून अनधिकृतपणे वाहतूक करणारा ट्रक (केए-५६, ०६२२) वन विभागाच्या पथकाने २९ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता पोलादपूर नाका येथे ताब्यात घेतला. त्यात सुमारे ५० हजार ४९० रुपये किमतीचे आकेशिया लाकडाचे ५४ नग आढळून आले. हा ट्रक वन विभागाने ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी मोहम्मद झाकीउद्दिन मोहम्मद हुसैन (रा. त्रिपुरानाथ), हवप्पा उर्फ अविनाश चिंचोळीकर (रा. त्रिपुरानाथ) यांच्यावर भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१, (२)(ब) ४२, मुंबई वन अधिनियम १९४२ चे कलम ६६चे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अल्पवयीन पुतणीवर अत्याचार करणाऱ्या चुलत्याला कारावास

## माणगाव विशेष न्यायालयाचा निर्णय

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकण-खांबेश्वरवाडी येथे एका अल्पवयीन मुलीवर शारिरीक अत्याचार करणाऱ्या अपंग चुलत्याला माणगाव विशेष न्यायालयाने मरेपर्यंत कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

पोलादपूर तालुक्यातील वाकण-खांबेश्वरवाडी येथे २० जुलै २०२०रोजी दुपारी पीडित आठ वर्षीय मुलीला तिच्या अपंग असलेल्या काकाने मोबाइल दाखविण्याच्या बहाण्याने बोलावून घेतले आणि ती मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही तिच्याशी शारिरीक संबंध प्रस्थापित केले. या प्रकाराबाबत कुणासही काहीही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलादपूर पोलिसांनी पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक महेंद्र लोणे यांनी दोषारोप पत्र तयार केले तर सहाय्यक निरिक्षक प्रशांत जाधव यांनी माणगांव येथील जिल्हा व सत्र न्यायालयासमोर दोषारोप पत्र दाखल केले.

या खटल्याची सुनावणी माणगाव येथे विशेष न्यायालयामध्ये झाली असता पीडित मुलीची साक्ष व वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा ठरला. या खटल्यामध्ये अतिरिक्त शासकीय अभियोक्ता तथा सहाय्यक सरकारी वकील ॲड. योगेश तेंडूलकर यांनी सरकार पक्षाचे काम पाहिले आणि अतिशय महत्वाचे न्यायनिर्णय सादर केले. सदर खटल्याचे पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरिक्षक यु. एल. धुमास्कर यांनी काम पाहिले. त्यांना महिला पोलीस हवालदार छाया कोपनर, शशिकांत कासार व शशिकांत गोविलकर, पोलीस शिपाई सुनील गोळे आणि सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले.

विशेष व सत्र न्यायाधिश पी. पी. बनकर यांनी गुन्ह्याच्या शाबितीनंतर आरोपी यास मंगळवारी (दि. २) दोषी ठरवून मरेपर्यंत कारावासासह १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

# रायगड पोलिसांची सायबर साक्षर सुरक्षित गाव मोहीम पोहचली म्हसळा तालुक्यात

**म्हसळा : प्रतिनिधी**

सायबर फसवणुकीबाबत सर्वांना जागरूक करण्यासाठी रायगड पोलीस दालातर्फे जिल्ह्यांतील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या माध्यमातून सायबर साक्षर सुरक्षित गाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यासाठी तालुक्यातील खरसई गावाची निवड केली असल्याची माहिती म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक उध्दव सुर्वे यांनी दिली.

### खरसई गावाची केली निवड

घरफोडी आणि लुटमारीपेक्षा दरवर्षी सायबर फसवणुकीच्या घटना जास्त होत असतात. पीडित व्यक्तीने स्वत: ओटीपी दिला किंवा क्लिक करू नये, असे काहीतरी क्लिक केले की, रक्कम सायबर गुन्ह्यांमध्ये गमावली जाते. याचा आभ्यास केल्यास व सायबर गुन्हे कसे होतात हे जाणून घेतल्यास ते टाळता येऊ शकते. याचा अभ्यास करून रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी जिल्ह्यांत प्रत्येक पोलीस ठाण्याच्या माध्यमांतून 'सायबर साक्षर सुरक्षित गाव' मोहीम सुरू केली आहे, अशी माहिती म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक उध्दव सुर्वे यानी वार्तालाप कार्यक्रमात दिली. म्हसळा तालुक्यातील खरसई गावात सायबर साक्षर सुरक्षित गाव मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

सोमजाई संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत खोत, ज्येष्ठ सामाजिक नेते परशुराम मांदाडकर, खरसई ग्रामपंचायत सदस्य जगदीश खोत, बिना कातळकर, दीपाली कांबळे, जयश्री मांदारे, भारती शीतकर, आगरी समाज अध्यक्ष नामदेव खोत, बौध्द समाज अध्यक्ष अनिल कासारे, हरिश्चन्द्र कांबळे, माजी पोलीस पाटील काशिनाथ शीतकर, चंद्रकांत म्हात्रे, जनार्दन पयर, विजय पयर, दत्ताराम पयर, हायस्कुलचे मुख्याध्यापक मुलाणी सर, मराठी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी राठोड, उर्दू शाळेचे बंदरकर या वेळी उपस्थित होते.

# जिल्ह्यात चोख पोलीस बंदोबस्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

मंगळवारी साजरा करण्यात येणाऱ्या रमजान ईद सणाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. राज्य राखीव दलासह, दंगल नियंत्रण पथके आणि शिघ्रकृती दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत.

मुस्लिम समाजाचा हा सण शांततेत पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी जिल्ह्यात शिघ्रकृती दलाची सात, दंगल नियंत्रण पथक आणि राज्य राखीव दलाच्या प्रत्येकी दोन पथकांसह जिल्ह्यातील १७०० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तसेच २५० गृहरक्षक दलाचे जवान तैनात केले जाणार आहेत. दरम्यान, रमजान ईदच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमार्फत शांतता कमिट्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सामाजिक सलोखा कायम राखण्याचे आवाहन पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.

# रायगडात आज साजरी होणार रमजान ईद

**माणगाव : प्रतिनिधी**

ईद-ऊल-फित्र म्हणजेच रमजान ईद मंगळवारी (दि. ३) रायगड जिल्ह्यात साजरी होणार आहे.

इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो. यावर्षी २ एप्रिल रोजी चंद्रदर्शन झाल्यानंतर रमजान महिन्याला सुरुवात झाली. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) करतात. तसेच नमाज पठण व कुराण वाचन, जकात देणे (दानधर्म करणे) यावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. रमजान महिन्यावर गेली दोन वर्षे कोरोनाचे संकट होते. त्यामुळे बहुतांशी मुस्लिम बांधवांनी शासनाच्या निर्बंधाचे पालन करीत घरातूनच ईदची नमाज (प्रार्थना) अदा केली. मात्र यावर्षी विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांवरील निर्बंध उठविण्यात आले आहेत.

सोमवारी रमजानचे सर्व ३० रोजे पूर्ण झाल्याने आज मंगळवारी रमजान ईद साजरी केली जाणार आहे. या रमजान ईदची सामुदायिक नमाज मंगळवारी माणगाव नगरपंचायत हद्दीतील जामा मशिदीत सकाळी ८ वाजता होणार असल्याची माहिती येथील मस्जिद मोहल्ल्याचे अध्यक्ष सरफराज अफवारे यांनी दिली.


**दिनांक २९/०४/२०२२ वादीचे वकील : कौस्तुभ पाटील**

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात**

स्पे.मु.क्र.१२९/२०२२
नि.क्र.१६/ड
ने.ता. १५/६/२२

**श्री. बाळकृष्णा गोपीनाथ घरत व इतर ........ वादी**

**विरुद्ध**

श्री. अनिल लक्ष्मण वांद्रे व इतर .......... **प्रतिवादी**

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल याचे न्यायालयात स्पे.मु.क्र.१२९/२०२२ हा दावा वादी १. श्री.बाळकृष्णा गोपीनाथ घरत, २.श्री. शांताराम लक्ष्मण पाटील, ३. श्री.मच्छिंद्र विठ्ठल पाटील, ४. श्री. काशिनाथ रघुनाथ भोईर, ५. श्री विलास किसन पाटील, ६. श्री.सदानंद चिंतु पाटील, ७. श्री. प्रभाकर जनार्दन घिरत, ८. श्री. संजय लक्ष्मण घरत, ९. श्री. अनिल जाधव घरत, १०. श्री प्रभाकर हरिश्चंद्र भोईर, ११. श्री.धर्मेंद्र शांताराम ठाकूर, १२. श्री.लिलेश्वर जनार्दन घरत, १३. श्री. पांडुरंग परशुराम घरत, १४. श्री.दत्ताराम जाखू पाटील, १५. श्री. लिलाधर वामन भोईर, १६. श्री. चेतन काशिनाथ पाटील, १७. श्री. चंद्रकांत खुशाल ठाकूर यांनी स्वत:करीता व दिवाणी आचार संहिता १९०८ चे ऑर्डर १ रुल ८ प्रमाणे पाणजे डोंगरी मवरीखार समिती यांचे तर्फे प्रतिनिधी स्वरुपात प्रतिवादी १.श्री. अनिल लक्ष्मण वांद्रे, २. श्री. विजय दत्ताराम पाटील, ३, श्री. राजेश दत्ताराम पाटील, ४. श्रीमती नलिनी दिलीप पाटील, ५. श्रीमती मंदाकिनी वसंत पाटील, ६. श्रीमती कविता प्रकाश पाटील, ७. श्री.गंगाधर गोपीनाथ भोईर, १८. श्री. रोहिदास गोपीनाथ भोईर, ९. श्री हरिश्चंद्र गोपीनाथ भोईर, १०. श्री. हसुराम महादेव पाटील, ११. श्री.देविदास महादेव पाटील, १२. श्रीमती बबन यादव भोईर, १३. श्री लखपती हसुराम पाटील, १४. श्री.संजय प्रभाकर घरत, १५. श्री. अशोक शंकर कडू, १६. शहर व औद्योगिक विकास महामंडळ, १७. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको यांचे विरुद्ध खाली वर्णन केलेल्या दावा मिळकतीकरीता दाखल केला आहे.

| युनिट केस क्र. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| डोंगरी ३४ | १९ | १२ | ०-३९-० |
| | १९ | ११ | ०-०५-० |
| | १९ | २१ | ०-०५-४ |
| | | **एकूण क्षेत्र** | **०-४९-४** |

सदरचा दावा हा दावा मिळकत वादी व मवरीखार गावकीची सामायिक मालकीची होती व दावा मिळकतीच्या मोबदल्यात मिळणाऱ्या द्रोणागिरी फाईल क्र.२३९२ नुसार द्रोणागिरी येथे ४५० चौ. मीटर क्षेत्राचा भूखंड व नुकसान भरपाईमध्ये वादीचा व मवरीखार गावकीचा संपूर्ण हक्क आहे असे जाहीर करण्याकरीता तसेच प्रतिवादी क्र. १ ते १५ यांनी रक्कम रुपये २,१५,२५,०६५/व व्याज रक्कम रूपये ३,८७,४५१ (दिनाक १७/०१/२०२२ ते ३१/०३/२०२२ पर्यंत) एकूण रक्कम रुपये २,१९,१२,५१६/वादी यास देण्याचे आदेश करण्याकरीता दाखल केला आहे.

सदरचा दावा प्रतिनिधी स्वरुपात असल्याने याद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वादी व्यतिरिक्त अन्य कोणाचेही हक व अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दिनांक १४/०६/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता आपल्या हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेऊन या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा मा.न्यायालय योग्य ती कायदेशीर कारवाई करेल.

सदर नोटीस दि. २९/०४/२०२२ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिली.

**सही/-**
**कनिष्ट लिपीक**
**दिवाणी न्यायालय पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय पनवेल**



## खुली ई निविदा सूचना

**ग्रामपंचायत खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड**

**सूचना क्रमांक : ०१ सन : २०२१-२०२२**

ग्रामपंचायत खानावळे तालुका-पनवेल जिल्हा-रायगड यांचेकडील ग्रामपंचायत सन २०२१-२२ ग्रामनिधी अंतर्गत खालील कामाची योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून Percentage Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पद्धतीने संगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परतावा) | १% इसारा/बयाना रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Supplying & Erecting Underground Cable From RZP School To Technick Engineering Company At. Khanavale. | 749970.00 | 500.00 | 7499.00 |
| 2. | Supplying & Erecting Underground Cable From Creative Society To Swagat Kaman At. Khanavale. | 581924.00 | 500.00 | 5819.00 |
| 3. | Supplying & Erecting Underground Cable From Bharati Cement Compound To Suryawahan Gate At. Khanavale. | 467222.00 | 500.00 | 4672.00 |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :**

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सूचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
२. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड) | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड) | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक : [ ११.०५.२०२२ ] सकाळी ११.०० वाजता. | | | |

३. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
४. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
५. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
**६. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रे ई-निविदा मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे तसेच सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर ठेकेदारांनी स्वत:च्या (Digital Signature Certificate) स्वाक्षरीने साक्षांकित करूनच अपलोड करावी. अन्यथा सदरची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.**

**सही/- सरपंच ग्रामपंचायत खानावळे** | **सही/- ग्रामसेवक ग्रामपंचायत खानावळे**

७. निविदा दर हे Percentage Rate ने भरावयाचे आहे.
८. सदर निविदा विद्युत नोंदणीकृत ठेकेदारांनाच ही निविदा भरता येईल.
९. सदर निविदेसाठी नोंदणी प्रमाण पत्र (Registration copy) प्रत online सादर करावी.
१०. GST प्रत online सादर करावी.
११. Pancard कॉपी ऑनलाईन सादर करावी.
१२. Adhar card कॉपी ऑनलाईन सादर करावी.
१३. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION) online सादर करावे.
१४. Income tax / vat परतावा ऑनलाईन सादर करावी.
१५. BID CAPACITY Certified By C.A प्रत आवश्यक राहील.
१६. PT Certificate प्रत आवश्यक राहील.
१७. ग्रामपंचायत खाते नावे DD जोडला असल्यास तो निविदा उघडण्यापूर्वी ग्रामपंचायतमध्ये सादर करावा न केल्यास कमी दराने भरलेली निविदा रद्द करण्यात येईल.
१८. मागील केलेल्या कामाचा कालावधी बाबत (WORK DONE CERTIFICATE) STATEMENT FORMAT मध्ये ऑनलाईन सादर करावी.
१९. सदर निविदा प्रक्रियेसाठी किमान ३ निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
२०. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
२१. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अशा अधिकाऱ्यासमोर करून द्यावा लागेल.
२२. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
२३. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबंधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
२४. निविदेबाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत खानावळे निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
२५. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास, त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.
**२६. या कामासाठी आलेल्या निविदा पैकी कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहे आणि निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.**
**२७. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.**
२८. सदरील कामाच्या दर्जा संदर्भात महाराष्ट्र शासन नियमानुसार देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
२९. ठेकेदाराच नाव, कायमचा राहण्याचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक ई. तपशिलाची माहिती विभागास सत्वर सादर करण्यात यावी.

**सही/- सरपंच ग्रामपंचायत खानावळे** | **सही/- ग्रामसेवक ग्रामपंचायत खानावळे**



## खुली ई निविदा सूचना

**ग्रामपंचायत खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड**

**सूचना क्रमांक : ०१ सन : २०२१-२०२२**

ग्रामपंचायत खानावळे तालुका-पनवेल जिल्हा-रायगड यांचेकडील ग्रामपंचायत सन २०२१-२२ ग्रामनिधी अंतर्गत खालील कामाची योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून Percentage Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पद्धतीने संगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परतावा) | १% इसारा/बयाना रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Construction Of Cement Concrete Road From Kamalakar Labade To Ramesh Thakur At. Khanavale. | 997855.00 | 500.00 | 9978.00 |
| 2. | Construction Of Cement Concrete Road From Sabhaji Labade To Samir Mujavar At. Khanavale. | 999540.00 | 500.00 | 9995.00 |
| 3. | Construction Of Cement Concrete Road From Primary School To Ragho Narayan Labade At. Khanavale. | 998577.00 | 500.00 | 9985.00 |
| 4. | Construction Of Cement Concrete Road From Pravin Dalvi To Bhau Dudhya Labade At. Khanavale. | 999323.00 | 500.00 | 9993.00 |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :**

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सूचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
२. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड) | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड) | ०४.०५.२०२२ | सकाळी ११.०० पासून | १०.०५.२०२२ | सकाळी १०.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक : [ ११.०५.२०२२ ] सकाळी ११.०० वाजता. | | | |

३. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
४. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
५. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
**६. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रे ई-निविदा मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे तसेच सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर ठेकेदारांनी स्वत:च्या स्वाक्षरीने साक्षांकित करूनच अपलोड करावी. अन्यथा सदरची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.**

**सही/- सरपंच ग्रामपंचायत खानावळे** | **सही/- ग्रामसेवक ग्रामपंचायत खानावळे**

७. सदर निविदा दर सन २०२०-२१ करिता मंजूर राहील.
८. निविदा दर हे Percentage Rate ने भरावयाचे आहे.
९. सदर निविदा जिल्हा परिषद रायगडकडील नोंदणी केलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांनाच ही निविदा भरता येईल.
१०. सदर निविदेसाठी नोंदणी प्रमाणपत्र (Registration copy) प्रत online सादर करावी.
११. GST प्रत online सादर करावी.
१२. Pancard कॉपी ऑनलाईन सादर करावी.
१३. Adhar card कॉपी ऑनलाईन सादर करावी.
१४. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION) online सादर करावे.
१५. Income tax / vat परतावा ऑनलाईन सादर करावी.
१६. BID CAPACITY Certified By C.A प्रत आवश्यक राहील.
१७. PT Certificate प्रत आवश्यक राहील.
१८. ग्रामपंचायत खाते नावे DD जोडला असल्यास तो निविदा उघडण्यापूर्वी ग्रामपंचायतमध्ये सादर करावा न केल्यास कमी दराने भरलेली निविदा रद्द करण्यात येईल.
१९. मागील केलेल्या कामाचा कालावधी बाबत (WORK DONE CERTIFICATE) STATEMENT FORMAT मध्ये ऑनलाईन सादर करावी.
२०. सदर निविदा प्रक्रियेसाठी किमान ३ निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
२१. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
२२. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अशा अधिकाऱ्यासमोर करून द्यावा लागेल.
२३. सु.बे.अ व मजूर सहकारी संस्था यांनी विहित नमुन्यात हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा कोणतीही पूर्वसूचना न देता निविदा प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येतील.
२४. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
२५. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबंधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
२६. निविदेबाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत खानावळे निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
२७. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास, त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.
**२८. या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहे आणि निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.**
**२९. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.**
३०. सदरील कामाच्या दर्जा संदर्भात महाराष्ट्र शासन नियमानुसार देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
३१. ठेकेदाराचे नाव, कायमचा राहण्याचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक इ. तपशिलाची माहिती विभागास सत्वर सादर करण्यात यावी.

**सही/- सरपंच ग्रामपंचायत खानावळे** | **सही/- ग्रामसेवक ग्रामपंचायत खानावळे**

## आमदार महेश बालदी यांच्या मध्यस्थीने

# चौक गावातील अंतर्गत रस्त्याचे काम मार्गी

**चौक : रामप्रहर वृत्त**

चौक गाव बाजारपेठेतील अंतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम येथील ग्रामस्थांनी थांबविले होते. गटारांचे काम केल्यानंतरच रस्त्याचे बांधकाम करा, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतल्याने आमदार महेश बालदी यांनी येथे सोमवारी (दि. २) भेट घेऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. नियोजित काम पूर्ण करून पुढील वेळी आमदार निधीतून किंवा अन्य निधीतून सहाय्य करून हे रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.



पूर्वी चौक गावातून मुंबई-पुणेकडे जाणारा महामार्ग होता. कालांतराने सातत्याने होणारे अपघात यामुळे हा मार्ग बाहेरून काढण्यात आला. या मार्गाचे काँक्रिटीकरण करणे गरजेचे असल्याने कामास सुरुवात झाली होती, परंतु कोरोना काळात हे काम बंद पाडले होते. त्यानंतर पुन्हा हे काम सुरू करण्यात आले. काम होत असलेल्या ठिकाणी कोल्हापूर पेठेत जुन्या प्रकारचे वस्ती असल्यामुळे पावसाळ्यात या ठिकाणी पाणी निचरा होत नाही. त्यामुळे येथील घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरते. हे काम सुरू असताना प्रथम गटार बांधकाम करून नंतरच रस्त्याचे काम पूर्ण करा अशी येथील ग्रामस्थांनी मागणी केली होती. ग्रामस्थांनी हे काम बंद केले होते. त्यांची समस्या लक्षात घेऊन आमदार महेश बालदी यांनी येथे भेट देऊन व संपूर्ण रस्त्याची पाहणी करून ग्रामस्थांशी चर्चा केली. नियोजित काम पूर्ण करून पुढील वेळी आमदार निधीतून किंवा अन्य निधीतून सहाय्य करून हे रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल अशी ग्वाही दिली, तसेच ठेकेदाराशी चर्चा करून कामास पुन्हा सुरुवात केली. त्यामुळे येथील रस्त्याचे काम मार्गी लागले आहे.

या वेळी भाजप खालापूर तालुका ध्यक्ष रामदास ठोंबरे, चौक जि. प. विभाग गणेश मुकादम, उपसरपंच चौक गणेश कदम, मनोज साखरे, रंजीत खंडागळे, पंकज शहा, वैभव भोइर, अभिजित देशमुख, परेश शहा, विनोद भोईर, सागर ओसवाल, निखिल मालुसरे, तन्वीर शेख, अवधूत करमरकर, दत्ता भोइर, जया ओसवाल, योगेंद्र शहा हे उपस्थित होते.

# नियोजनाअभावी नवी मुंबई मेट्रो अडकली

## सिडकोकडून अत्यावश्यक चाचण्या होऊनही दिरंगाई

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मेट्रो सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक सर्व चाचण्या झाल्या आहेत. महाराष्ट्र दिनी ही सेवा सुरू होणे अपेक्षित होते, मात्र सिडकोकडून अद्याप हिरवा कंदील मिळत नसल्याने ११ वर्षांपासून ही मेट्रो सेवा अद्यापही अडकली आहे.

सिडकोने बेलापूर ते पेंधर या ११ किमीच्या मार्गाचे काम २०११मध्ये सुरू केले आहे. उद्घाटनाच्या वेळी २०१४मध्ये मेट्रो धावेल, असे विश्वास व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, अनेक विघ्न आल्याने काम रखडले. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी ही सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने गतवर्षी प्रकल्पाची देखभाल व प्रकल्प सुरू करण्याचे काम महामेट्रोला दिले.

### ११ किमीसाठी ११ वर्षे प्रतीक्षा

**बेलापूर ते पेंधर हा ११ किमीच्या मेट्रो प्रकल्पाचा शुभारंभ २०११ साली करण्यात आला, मात्र त्यानंतर कामात अनेक विघ्ने आली. सिडकोने महामेट्रोचे नियुक्ती करून पेंधर ते सेंट्रल पार्कदरम्यान पहिल्या टप्पा सुरू करण्याच्या हालचाली सुरू केल्या. सर्व चाचण्या पूर्ण होऊन प्रमाणपत्र मिळूनही सिडकोकडून हिरवा कंदील मिळत नसल्यामुळे मेट्रो सुरू करता येणार नसल्याचे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

सप्टेंबर महिन्यात वेग आणि इतर प्रमाणपत्र दिले गेले. एप्रिल महिन्यात रेल्वेसुरक्षा मंडळाकडून पत्रही प्राप्त झाले आहे. याबाबत सिडकोच्या अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता, सर्व परवानग्या मिळाल्या मात्र मॅनेजमेंट समिती याविषयी काम पाहत असल्याचे सांगून अधिक बोलण्यास नकार दिला.

सिडकोने नवी मुंबई मेट्रोचे काम सुरू झाल्यावर काही अधिकाऱ्यांकडे नवी मुंबईच्या मेट्रोची जबाबदारी सोपविली. १० वर्षांत मेट्रोचे काम पाहणारे काही अधिकारी सेवानिवृत्त झाले. सिडकोच्या माजी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, मेट्रोसाठी लागणारी जागा आहे. सिडकोकडे पैसा आहे, मात्र योग्य नियोजन नसल्यामुळे ११ वर्षांत मेट्रो सुरू करता आली नाही, असे त्यांनी सांगितले.

## मोबाईल चॉइस एमपीचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन



**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील द्रोणागिरी येथे मोबाईल चॉइस एमपीचे उद्घाटन रविवारी (दि. १) आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. मोबाईल चॉइस एमपीचे मालक मननशेठ पटेल यांनी आमदार महेश बालदी व इतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी नगरपरिषद उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण शहराध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, माजी नगरसेवक सुनील कोळी, उद्योजक राजेंद्र पडते, हस्तीमल मेहता, हितेश शाह, राजेश पटेल, सुनील पेडणेकर, अजित भिंडे, मनोज ठाकूर, मनोहर सहतिया व मित्रपरिवार उपस्थित होते.

## नवी मुंबई महापालिकेत लोकशाही दिनी दोन प्रकरणे निकाली

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मे महिन्याच्या लोकशाही दिनात आरोग्य विभागाशी संबंधित दोन निवेदने प्राप्त झालेली होती. त्यापैकी अर्जदार व्यक्तीश: उपस्थित असलेल्या एका निवेदनाबाबत महापालिका आयुक्त के. अभिजीत बांगर यांनी अर्जदार व संबंधित अधिकारी यांच्याशी संयुक्त चर्चा करून पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले.

जून महिन्याचा लोकशाही दिन ६ जून रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २० मेपर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचे आहे.

अर्जात नमूद तक्रार, निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे, अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा, अर्जादाराने संबंधित विषयाबाबात याआधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्याचप्रमाणे विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात आले आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालयासह नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळावरूनही डाऊनलोड करुन घेता येईल, असे महापालिकेतर्फे सांगण्यात आले आहे.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातून एक १५ वर्षीय मुलगा त्याच्या राहत्या घरच्या इमारतीच्या खाली खेळण्यासाठी गेला असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे अपहरण केल्याची घटना ऊसर्ली खुर्द येथे घडली. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. मुलाची उंची १६६ सेमी, वर्ण गोरा असून अंगात राखाडी जीन्स पॅन्ट व लालसर फुलबाह्याचा शर्ट परिधान केला आहे. या मुलाबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सपोनि. शिवाजी होळगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत कोरोना रुग्ण वाढण्याचा धोका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईमध्ये कोरोना रुग्णसंख्येत वाढ होत ती आता दोन अंकी झाली आहे. त्यामुळे दैनंदिन कोरोना चाचण्या पाच हजारांपर्यंत करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

गेल्या महिनाभरापासून नवी मुंबईतील कोरोना रुग्णासंख्या अल्प झाली होती मात्र एप्रिल महिन्याच्या शेवटी रुग्णांची संख्या दोन अंकी झाल्यामुळे महापालिका प्रशासन सतर्क झाले आहे. त्यामुळे तीन हजारांपर्यंत होत असलेल्या करोना चाचण्या आता पाच हजार करण्यात आल्या आहेत.

कोरोना रुग्णांची संख्या वाढत असली तरी शहरातील कोरोना स्थिती सध्या नियंत्रणात आहे. शासनाकडूनही सर्वच पालिकांना सतर्कतेचे निर्देश प्राप्त झाले आहेत. आणखी रुग्णवाढ झाल्यास बंद केलेले वाशी प्रदर्शनी केंद्रातील करोना रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे.

**नवी मुंबईत कोरोनाची रुग्णसंख्या नियंत्रणात आहे, परंतु आता रुग्ण वाढत आहेत. त्यामुळे चाचण्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. नागरिकांनी खबरदारी घ्यावी. मास्कचा वापर करावा.**
**- संजय काकडे, अतिरिक्त आयुक्त**

## उरणमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात



**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापनदिन समारंभानिमित्त रविवारी (दि.१) सकाळी ८ वाजता आमदार महेश बालदी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झाले.

या वेळी उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, नगराध्यक्षा सायली म्हात्रे, नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, निवासी नायब तहसीलदार गजानन धुमाळ, सी. आर. पाटील, वैशाली पाटील, नितीन पाटील, उद्योजक राजेंद्र पडते, हितेश शाह, संतोष पवार, संजय शिंदे, ललिता घरत, मंडळ अधिकारी, तलाठी व कार्यालीन कर्मचारी उपस्थित होते. उरण नगरपरिषद कार्यालयाच्या प्रांगणातही नगरपरिषद मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.



## पनवेल परिवहन विभागाकडून स्वच्छता व वृक्षसंवर्धन मोहीम



**पनवेल : वार्ताहर**

परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक यांच्या वतीने तळोजा मजकूर येथील ब्रेकटेस्टिंग ट्रॅक येथे एका अनोख्या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. पनवेल मोटार वाहन निरीक्षक संदीप कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली, ब्रेक टेस्टिंग ट्रॅक येथे लावण्यात आलेल्या झाडांना पाणी घालण्यात आले तसेच संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. तळपत्या उन्हामध्ये झाडांना पूर्ण वेळ पाणी मिळत राहिल याची खास व्यवस्था करण्यात आली आहे. यासोबतच झाडांना रंग लावण्याचे काम केले.

या मोहिमेत संजय पाटील, माने, दिनेश बागुल, संदीप करचे, बाबर, विशाल सुपेकर, आशिष जयसिंगपुरे, रोहित पवार, महापालिका सफाई कामगार अजिंक्य दळवी, मुकादम अभिजित गरुडे आणि इतर कर्मचारी वर्ग, कोकण रिक्षा टॅक्सी महसंघाचे उपाध्यक्ष बाळा झोडगे, पनवेल टॅक्सी संघटनेचे पदाधिकारी दिपक नावडेकर सहभागी झाले होते.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच

## दुसऱ्या दिवशीही शासनाकडून दखल नाही

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी सदस्य आपल्या मागण्यांसाठी आक्रमक झाले आहेत. या कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि. १)पासून कामबंद आंदोलन सुरू केले असून सोमवारी (दि. २) दुसऱ्या दिवशीही प्रशासनाने त्यांच्या आंदोलनाची दखल घेतलेली नाही.

संपूर्ण महाराष्ट्रातील नगर परिषद व नगर पंचायतीचे अधिकारी, कर्मचारी या बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हा लढा असाच सुरू राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल यांनी दिली आहे. मागण्या पूर्ण होत नसल्याने हा लढा आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.



### कामगारांच्या मागण्या

**राज्यातील नगरपालिका व नगर पंचायत कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला १०० टक्के वेतन, वेतन अनुदान मंजूर करावे, १०-२०-३० वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ, सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची तीन हप्ते मिळावेत, नवीन नगरपंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांना विनाअट समावेशन करावे, नवीन सफाई कर्मचाऱ्यांची आकृतिबंधामध्ये पद निर्मिती करावी, सेवेत असताना मृत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती द्यावी, थकित सहाय्यक अनुदानाची रक्कम त्वरित मिळावी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांची कायदेशीर देणी एकरकमी द्यावीत, हंगामी व ठेकेदार कर्मचाऱ्यांना समान कामाला समान वेतन या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे वेतन मिळावे.**

## उरण येथे शांतता कमिटीची बैठक

**उरण : वार्ताहर**

उरण शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उरण पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) धनाजी शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी सदस्यांची बैठक रविवारी (दि. १) घेण्यात आली.

या बैठकीमध्ये सुरू असलेल्या घडामोडींबाबत चर्चा करण्यात आली. आगामी सणांच्या पार्श्वभूमिवर सर्व जाती-धर्माच्या लोकांनी आपआपसात वादविवाद करू नये, अशा सूचना देण्यात आल्या, तसेच सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेण्याबाबत सूचना दिल्या.

सर्व नागरिकांनी पोलीस ठाण्यास सहकार्य करावे पोलीस आपले मित्र आहेत. पोलीसही आपल्याला सहकार्य करतील, असे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी शिरसागर यांनी सांगितले.

या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, मोरा सागरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित मोहिते, न्हावा शेवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे, पोलीस अधिकारी, कर्मचारी व ४० शांतता कमिटी सदस्य उपस्थित होते.



## पनवेल शहरात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

या व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे, रंग काळा, उंची सुमारे ४.५ फूट, डोके व दाढीवरील केस पांढरे साधारण वाढलेले, पांढरा फुल बाह्यांचा शर्ट व राखाडी ट्रॅकपँट परिधान केली आहे. या व्यक्तीबाबत परिसरात पोलिसांनी चौकशी केली असता कोणालाही या व्यक्तीबद्दल कोणतीच माहिती नसल्याचे चौकशीमध्ये आढळून आले आहे. त्यामुळे या मृतदेहाच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घणसोलीतील पाणी प्रश्नावर तोडगा निघणार

## माजी नगरसेवक घनश्याम मढवी यांच्या इशाऱ्यानंतर आश्वासन

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली गाव व काही सेक्टरमध्ये भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. वारंवार परिसरातील नागरिक व लोकप्रिनिधींनी पालिकेकडे तक्रार अर्ज करूनदेखील कोणतीही उपाययोजना न झाल्याने अखेर भाजपचे माजी नगरसेवक घनश्याम मढवी यांनी परिसरातील नागरिकांचा हंडा मोर्चा काढण्याचा इशारा पालिकेला व पोलिसांना दिले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी तातडीने लोकप्रतिनिधी व पालिका अधिकाऱ्यांची सोमवारी बैठक बोलावली. या बैठकीत पालिकेकडून काही दिवसांची मुदत मागून घेतली असून तातडीने पाणी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले.



हा मोर्चा सोमवारी (दि. २) काढण्यात येणार होता. त्याबाबत रबाळे पोलीस स्टेशन तसेच महापालिका आयुक्त अभिजीत बांगर व विभाग कार्यालयाला इशारा पत्र देण्यात आले होते, मात्र त्याआधीच पोलिसांनी पालिका व नागरिकांची बैठक आयोजित केली व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले.

रबाळे पालीस स्टेशनचे एसीपी डी. डी. टेळे व वपोनि. डी. डी. ढाकणे यांनी महापालिकेचे विभाग अधिकारी महेंद्रसिंग ठोके व त्यांच्या सहकाऱ्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावले. तत्काळ पाणी समस्येबाबत तोडगा काढण्यासाठी पालिका प्रशासनाला सूचना देण्यात आल्या. या वेळी विभाग अधिकारी महेंद्र ठोके यांनी पाणी पुरवठा व्यवस्थित करण्यात येईल, असे सांगितले.

लोकप्रतिनिधी व नागरिकांची लवकरच महापालिका आयुक्त बांगर तसेच शहर अभियंता संजय देसाई यांच्यासोबत बैठक लावून पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आश्वासित करण्यात आले तसेच मोर्चा स्थगित करण्याची विनंती विभाग अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाने केली. त्यानुसार स्थानिक शिष्टमंडळाने मोर्चा स्थगित केल्याचे सांगितले.

बैठकीला माजी नगरसेवक घनश्याम मढवी, नगरसेवक लक्ष्मीकांत पाटील, परिवहन समितीचे माजी सभापती मोहन म्हात्रे, दिलीप म्हात्रे, केशव पाटील, उपायुक्त रंजन पाटील, समाजसेवक श्याम पाटील, नामदेव जगताप, ज्ञानेश्वर पाटील, सिताराम मढवी, नामदेव पाटील, धर्मा भोईर, मदन सुदाम पाटील, गणेश खपके, सामाजिक कार्यकर्त्या ललिता मढवी, रेखा म्हात्रे, लता मढवी उपस्थित होते.

# पेण नगर परिषद कर्मचाऱ्यांचे

# बेमुदत काम बंद आंदोलन





(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनााचे लक्ष वेधण्यासाठी पेण नगर परिषदेचे कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले असून, सोमवारी (दि. २) दूसऱ्या दिवशी ९७ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले.

महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी १ मे २०२२ पासून बेमुदत कामबंद आंदोलनाची हाक दिली होती. त्याला प्रतिसाद देत पेण नगर परिषदेचे कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. त्यांनी आज ठिय्या आंदोलन केल्यामुळे पेण नगर परिषदेचे कामकाज ठप्प झाले होते.

सोमवारी सकाळी पेण नगर परिषद कर्मचारी संघटना गठीत करुन अध्यक्षपदी शिवाजी चव्हाण यांची एकमताने निवड करण्यात आली. या वेळी रमेश नागू सोनावणे हे सफाई कामगार २२ वर्षाच्या सेवेतून सेवानिवृत झाल्याने मुख्याधिकारी जीवन पाटील, लेखापाल किरण शहा, अंकीता इसाळ, शिवाजी चव्हाण यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ, शाल, भेटवस्तू देऊन निरोप देण्यात आला. यानंतर ठिय्या आंदोलन करून सर्वांनी एकजूट दाखविली. किरण शहा, शिवाजी चव्हाण, शेखर अभंग, आरोग्य विभागाचे अंकिता इसळ, बांधकाम अभियंता बनसोडे, पाणी पुरवठा विभागाचे रमेश देशमुख, विश्वनाथ गायकवाड यांनी मार्गदर्शन करुन कामगारांमध्ये चैतन्य निर्माण केले.

कर्मचारी संघटना आपल्या मागण्यासाठी आंदोलन करत आहे, मात्र त्याचा अत्यावश्यक सेवेवर कोणताही परिणाम झाला नसल्याचे मुख्यधिकारी जीवन पाटील यांनी सांगितले.


## मोर्बा येथील आठ वर्षीय अब्दुल्लाने पूर्ण केले रोजे



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा धनसे मोहल्ला येथील फरीद टाके यांचा पुत्र अब्दुल्ला टाके याने वयाच्या आठव्या वर्षी पवित्र रमजानचे सर्व रोजे (उपवास) यशस्वीपणे पूर्ण केल्याने त्याचे मोर्बा गावासह माणगाव तालुक्यातून विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.

इस्लाम धर्मात ईमान, नमाज, रोजा, जकात, हज ही पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रमजान महिन्यातील रोजा हा एक आहे. यावर्षी ३ एप्रिलपासून रमजान रोजे सुरु झाले होते. हे रोजे अत्यंत कडक असतात. यावर्षी कडक उष्म्याने नागरिक हैराण होत होते. या परिस्थितीत अब्दुल्ला टाके याने रमजानचे सर्व रोजे पूर्ण करून तो पहिल्या रमजानचा मानकरी ठरल्याने त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



(छाया : संतोष पेरणे)

# नेरळमध्ये पोलिसांकडून रूट मार्च

कर्जत : बातमीदार

हिंदू-मुस्लिम धर्मियांचे पवित्र सण एकाच दिवशी आले असून कायदा आणि सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी नेरळ पोलिसांनी आपल्या हद्दीत रूट मार्च केले.

नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संमिश्र वस्ती असून गावात हिंदू आणि मुस्लिम धर्मीय अनेक वर्षे एकत्र राहत आहेत. कळंब गावातदेखील हिंदू, मुस्लिम लोकवस्ती आहे. यावर्षी मुस्लिम धर्मियांची पवित्र रमजान ईद आणि हिंदू धर्मातील अक्षय्यतृतीया हे महत्वाचे सण एकाच दिवशी आले आहेत. हे दोन्ही सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नेरळ आणि कळंब गावात शस्त्रांसह रुट मार्च केला. कर्जतचे पोलीस उपाधीक्षक विजय लगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या रुट मार्चमध्ये नेरळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र तेंडूलकर यांच्यासह दोन अधिकारी आणि ४० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

# विहूर पुलाचे काम फक्त माती भरावाने

## सिमेंट काँक्रिटची भिंत टाकण्यास सार्वजनिक बांधकाम खात्यास पडला विसर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे मुरुड-मुंबई रस्त्यावरील विहूर पूल वाहून गेला होता. या पुलाला सिमेंट काँक्रिटची भिंत बांधणे आवश्यक असतानासुद्धा मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाने फक्त मातीचा भराव टाकून सदरचे काम आटोपले आहे. त्याबद्दल प्रवासी व नागरिकांत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मुरुड हे पर्यटन स्थळ असल्याने येथे हजारोच्या संख्येने



गाड्यांची वाहतूक सुरू असते. मुरुड-मुंबई या मुख्य रस्त्यावरील वहूर येथील पूलाची दगडी संरक्षक भिंत गतवर्षी जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसात म ातीसह वाहून गेली होती. त्यावेळी या पुलावरील वाहतुकसुध्दा काही दिवस बंद ठेवण्यात आली होती. वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या या पूलाच्या संरक्षक भिंतीला फक्त मातीचा भराव टाकून मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाने अत्यंत जुजबी काम करून आपली जबाबदारी झटकली आहे.

दरम्यान, विहूर पुलाला कॉंक्रिटची संरक्षक भिंत उभारण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अलिबाग येथील कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेव यांनी सांगितले.



# अनाथाश्रमातील मुलांसोबत वाढदिवस साजरा

**कर्जत : बातमीदार**

नेरळजवळील धामोते गावातील प्रवीण दिनकर विरले यांनी आपला वाढदिवस वांगणी येथील किनारा अनाथाश्रमात जाऊन तेथील अनाथ, अंध आणि अपंग मुलांसमावेत साजरा केला.

या वेळी प्रवीण विरले अनाथाश्रमातील मुलांना बिस्किटे, चॉकलेट, पाण्याच्या बॉटल, शीतपेय आणि खेळणी भेट दिली. या वेळी पवन विरले, विनायक तांबोळी, हरेश मुंढे, राहुल कोल्हे, संदीप मसने आदी उपस्थित होते. किनारा अनाथाश्रममधील २० मुले आणि चार शिक्षकांना भेटवस्तूही देण्यात आल्या.

# माणगावात भरला कोकण खाद्य महोत्सव; खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मेवा शॉपीतर्फे माणगावमध्ये कोकण खाद्य महोत्सव २०२२ चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर रविवारी (दि.१) करण्यात आलेल्या या महोत्सवात गेले दोन दिवस खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. माणगाव शहरातील कमल फर्निचरशेजारी भरविण्यात आलेला हा महोत्सव ८ मे पर्यंत चालणार आहे.

या खाद्य महोत्सवात कोकणातील दर्जेदार खाद्य पदार्थांचे भव्य प्रदर्शन व विक्री करण्यात येणार आहे. महिला बचत गटांची उत्पादने, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील नामांकित कंपन्यांची दर्जेदार उत्पादने, देवगड व रत्नागिरीचा जगप्रसिद्ध हापूस आंबा, विविध प्रकारचे काजू, पेणचे प्रसिद्ध पापड यांच्यासह इतर बरेच खाद्यपदार्थ या महोत्सवात ठेवण्यात आले आहेत.

## माणगावमध्ये घरफोडी; रकमेसह ऐवज चोरला

**माणगाव : प्रतिनिधी**

शहरातील खांदाड भागात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ७२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. रविवारी (दि. १) रात्री ८ ते सोमवारी (दि. २) पहाटे ४.१५ वाजण्याच्या दरम्यान हा गुन्हा घडला.

खांदाड माणगाव येथील नितीन काशीराम वाघमारे यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला व घरातील सोन्याचा एक ब्रेसलेट, रिंग जोड तसेच रोख रक्कम व आधार कार्ड असा एकूण ७२ हजार रुपयांचा ऐवज घेऊम अज्ञात चोरट्यांनी पोबारा केला. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास उपनिरीक्षक डी. डी. आघाव करीत आहेत.

# वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचा उत्सव उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

धनगर समाजाचे आराध्यदैवत असलेल्या वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचा उत्सव रविवारी (दि. १) माजी पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री आमदार महादेव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

रविवारी सकाळी मंदिरात श्रींचा दुधाभिषेक, होमहवन आणि सत्यनारायण महापूजा झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जानकर यांच्या नेतृत्वाखाली पालखी मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. बोरघाटात हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांचे कीर्तन झाले. दुपारी मान्यवरांचा सत्कार करून महिलांसाठी हळदिकुंकवाचा कार्यक्रम झाला. सायंकाळी मंदिरात आरती करण्यात आसली.



शिंग्रोबा उत्सव कमिटीचे संस्थापक बबन शेडगे, बबन खरात, बाळासाहेब झोरे, बाळासाहेब आखाडे, नामदेव हिरवे, दीपक आखाडे, अध्यक्ष भरत कोकरे, उपाध्यक्ष वाघू कोकरे, सचिव लक्ष्मण बावदाने, खजिनदार बबन जानकर, सदस्य नारायण हिरवे, बापू बावदाने, एकनाथ घाटे, भीमा शिंगाडे, बाळू आखाडे, अरविंद गोरे, रामदास जानकर, सतीश गोरे, एकनाथ घाटे, पांडुरंग झोरे, पुणे जिल्हा परिषद माजी सदस्य गणेश धानिवले, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्तात्रय मसुरकर, माजी नगरसेवक मणेश यादव, सुनील पाटील, मोहन औसरमल, हरीश काळे, माजी नगरसेविका प्रमिला सुर्वे, लोणावळा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, ऑल इंडिया धनगर म हासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रविनजी काकडे, पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख तुकाराम कोकरे, धनगर समाज रायगड जिल्हा अध्यक्ष आनंदराव कचरे, माजी अध्यक्ष रामचंद्र पुकले, भगवान ढेबे, संतोष ढवळे, अनंता हिरवे, विद्याताई जानकर, योगिता कोकरे, नागेश मरगले, गोविंद कोकरे, संजय कोकरे, धूला कोकरे, संतोष बोडेकर, संतोष शिंगाडे नथु ढेबे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.com Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२२-२०२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १३/०५/२०२२ रोजी १८.०० वाजे पर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यात येतील. व दिनांक **१७/०५/२०२२ रोजी सकाळी ११.००** वाजेपर्यंत **ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर करण्यांत येतील.** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १७/०५/२०२२ रोजी ११.००** वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत बोर्डी ठाणे उलवा रेवस रेड्डी रस्ता प्र.रा.मा. ०४ कि.मी. ३३०/०० ते ३३५/०० मध्ये अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे डांबरे मिश्रीत खडीने पंचवर्क करून दुरूस्ती करणे तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ८३३३९५/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत देहेन पाष्टी पांगळोली रस्ता प्र.जि.मा. ७६ कि.मी. ०/०० ते ८/४०० मध्ये अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने पॅचवर्क करून दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. | ७६१२२९/- | ८०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत म्हसळा तळवडे रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. ०/०० ते २/५०० व ६/०० ते १०/०० मध्ये अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने पॅचवर्क करून दुरूस्ती करणे तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. | ८५००६४/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत नेवरूळ कोकबन सागवड रस्ता प्र.जि.मा. ७५ कि.मी. ०/०० ते ८/०० मध्ये अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने पॅचवर्क करुन दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. | ७४३६१३/- | ८०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | इंदापुर निजामपूर महाड विसापूर दापोली रस्ता रा.मा. ९७ कि.मी. ९२/२००, मध्ये सावित्री नदिवरील प्रमुख पुलाच्या बांधकामासाठी सर्वेक्षणाचे काम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रा.मा. ०३) | ३२७९९६/- | ४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ६ | इंदापुर निजामपूर महाड विसापूर दापोली रस्ता रा.मा. १४६ कि.मी. ०/६५०, मध्ये सावित्री नदिवरील प्रमुख पुलाच्या बांधकामासाठी सर्वेक्षणाचे काम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रा.मा. ०३) | ३२७९९६/- | ४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ७ | विर टोळ आंबेत बांगमांडला रस्ता रा.मा. १०० कि.मी. ०/४४७, मध्ये सावित्री नदिवरील प्रमुख पुलाच्या बांधकामासाठी सर्वेक्षणाचे काम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रा.मा, ०३) | ३९०१४०/- | ४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | निजामपुर येथील स्टोअर शेडची विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड. (विशेष दुरूस्ती कार्यक्रम) | ६६९९६३/- | ७०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | विर टोळ आंबेत बांगमांडला रस्ता रा.मा. १०० कि.मी. ०/४४७, मध्ये टोळ ब्रिज तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८४७४११/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मंडणगड तळा इंदापूर निजामपूर महाड विसापूर दापोली रस्ता रा.मा. ९७ कि.मी. ९२/२०० मध्ये दादली ब्रिजसाठी चाचणी बोअर घेणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ७१४३०१/- | ८०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | गांधारी पूल ओडीआर १४६ कि.मी. ०/६५० मध्ये पुलाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ३८३५००/- | ४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | मौजे बोरगाव, ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (खा.स्था.वि.) | ४४३५६८/- | ५०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १३ | मु.पो.तर्भे बुद्रूक, ता. पोलादपूर येथील लक्ष्मी नारायण मंदिर मार्ग (होळीचा तांडा) ते लक्ष्मी नारायण मंदिर रस्त्याचे डांबरीकरण व मजबूतीकरण करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड.(आ.स्था.वि) | ४४७०७२/- | ५०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १४ | ग्रा.पं. धामणसई ता. रोहा कालव्यापासुन गरबडवाडी आदिवासीवाडीपर्यंत कॉक्रीटीकरण रस्ता तयार करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (डोंगरी) | ८३३३९५/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १५ | तहसिलदार म्हसळा यांच्या निवासस्थानाभोवती कंपाऊंड वॉल बांधणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२) | ८६४५४१/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १६ | ग्रा.पं.आंबिवली ता. महाड मौजे आंबिवली पातेरेवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (डोंगरी) | ८४९४२६/- | ९०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

**ई निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. ०४/०५/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते ते १३/०५/२०२२ (१८.००) वाजेपर्यंत) |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. १७/०५/२०२२ वेळ ११.०० वाजता. |

**टिप :-**

परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र. मवि/लेशा/निविदा**
**दिनांक : २९/०४/२०२२**

**विमाका/कोवि/२०२२-२०२३/२७**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा. बां.) विभाग, महाड**

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | गुजरात वि. पंजाब | सायं. ७.३० वा., नवी मुंबई

# चेन्नईची हैदराबादवर मात

**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने सनरायझर्स हैदराबादचा १३ धावांनी पराभव केला. याद्वारे चेन्नईने स्पर्धेतील तिसरा सामना जिंकला आहे.



पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना चेन्नई सुपर किंग्जने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध २०२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात हैदराबादला २० षटकात सहा गडी गमावून १८९ धावा करता.

सनरायझर्स हैदराबादला पहिला झटका अभिषेक शर्माच्या रूपाने बसला. अभिषेक २४ चेंडूंत ३९ धावा करून बाद झाला. राहुल त्रिपाठीला खातेही उघडता आले नाही, तर एडन मार्क्रम १७ धावा करून परतला. कर्णधार केन विल्यमसन ४७ धावा करून बाद झाला. शशांक सिंग १५ आणि वॉशिंग्टन सुंदर दोन धावा करून बाद झाले. निकोलस पूरन ६४ धावांवर नाबाद परतला.

तत्पूर्वी नाणेफेक गमावल्यानंतर चेन्नईने फलंदाजीचा निर्णय घेतला होता. सलामीवीर ऋतुराज गायकवाडने ९९ आणि कॉनवेने नाबाद ८५ धावा केल्या. ऋतुराजचे मोसमातील पहिले शतक एका धावेने हुकले आणि टी. नटराजनने त्याला बाद केले. चेन्नईला दुसरा धक्काही धोनीच्या रूपाने नटराजनने दिला. चेन्नईने २० षटकांत दोन गडी गमावून २०२ धावा केल्या होत्या.



## कर्जतचा कबड्डीपटू आकाशची जिल्हा संघात निवड

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील पोशीर येथील जय हनुमान कबड्डी संघाचा तरुण खेळाडू आकाश कोंडिलकर याचा रायगड जिल्हा कुमार संघात समावेश करण्यात आला आहे.

पोशीर गावातील १७ वर्षीय युवक आणि कर्जत तालुक्यातील आघाडीचा चढाईपटू म्हणून आकाश कोंडिलकरची ओळख आहे. श्रमजीवी विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या आकाशने आपले सर्व लक्ष्य कबड्डी खेळाकडे केंद्रित केले आहे. जिल्हा कुमार संघात निवड झाल्याने त्याचे अभिनंदन होत आहे.

# लखनऊची विजयी घोडदौड; दिल्ली पराभूत

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्णधार केएल राहुल (५१ चेंडूत ७७ धावा) आणि दीपक हुडा (३४ चेंडूंत ५२) यांच्या अर्धशतकांनंतर मोहसिन खानने (४/१६) केलेल्या प्रभावी माऱ्यामुळे लखनऊ सुपर जायंट्सने रविवारी आयपीएलमध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर सहा धावांनी मात केली. लखनऊचा हा १० सामन्यांत सातवा आणि सलग तिसरा विजय ठरला.

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात लखनऊने दिलेल्या १९६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीला २० षटकांत ७ बाद १८९ धावांचीच मजल मारता आली. त्यामुळे ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील दिल्लीच्या संघाला आठ सामन्यांतील चौथा पराभव पत्करावा लागला.



या सामन्यात लखनऊचा कर्णधार राहुलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. राहुल आणि डावखुरा क्विंटन डीकॉक (१३ चेंडूत २३) सलामीवीरांनी लखनऊच्या डावाची चांगली सुरुवात केली. या दोघांनी चार षटकांत ४२ धावांची सलामी दिल्यावर डीकॉकला शार्दूल ठाकूरने बाद केले.

यानंतर राहुलने दीपक हुडाच्या साथीने ९५ धावांची भर घालत लखनऊच्या डावाला आकार दिला. त्याने चार चौकार आणि पाच षटकारांच्या साहाय्याने ७७ धावा, तर दीपकने ३४ चेंडूत सहा चौकार आणि एका षटकाराच्या साहाय्याने ५२ धावांची खेळी साकारली. अखेर या दोघांना शार्दूलने माघारी पाठवले. मग मार्कस स्टोइनिस (नाबाद १७) आणि कृणाल पंड्या (९ धावा) यांनी काही चांगले फटके मारल्याने लखनऊने २० षटकांत ३ बाद १९५ अशी धावसंख्या उभारली.

याचा पाठलाग करताना दिल्लीचे सलामीवीर पृथ्वी शॉ (५) आणि डेव्हिड वॉर्नर (३) यांना अनुक्रमे दुष्मंता चमीरा आणि मोहसिन यांनी झटपट माघारी धाडले. त्यामुळे दिल्लीची २ बाद १३ अशी स्थिती झाली. मग कर्णधार पंत (३० चेंडूत ४४) आणि मिचेल मार्श (२० चेंडूत ३७) यांनी ६० धावांची भागीदारी रचत दिल्लीचा डाव सावरला, मात्र, कृष्णप्पा गौतमने मार्शला, तर मोहसिनने पंतला बाद करीत दिल्लीला पुन्हा अडचणीत टाकले. अखेरच्या षटकांत अक्षर पटेल (२४ चेंडूत नाबाद ४२) आणि रोव्हमन पॉवेल (२१ चेंडूत ३५) यांनी फटकेबाजी केली, मात्र त्यांना दिल्लीला विजय मिळवून देता आला नाही.

# केएल राहुल नवा ‘सिक्सर किंग’

## रोहित, विराटला टाकले मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार केएल राहुलने नेहमीप्रमाणेच यंदाही आयपीएलमध्ये वादळ निर्माण केले आहे. रविवारी राहुलने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध शानदार खेळी केली. यादरम्यान त्याने पहिला षटकार मारताच तो आयपीएलमध्ये भारतासाठी सर्वांत वेगवान १५० षटकार मारणारा फलंदाज बनला.

केएल राहुलने ३५ चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने अर्धशतक पूर्ण केले. त्याचे आयपीएल कारकिर्दीतील हे २९वे अर्धशतक आहे. यंदाच्या आयपीएलमधील त्याचे हे तिसरे अर्धशतक. या मोसमात त्याने दोन शतकेही झळकावली आहेत. राहुलने आयपीएलमध्ये ४००हून अधिक धावा केल्या आहेत.

आयपीएलच्या इतिहासात भारताकडून सर्वांत जलद १५० षटकार ठोकण्याचा विक्रम संजू सॅमसनच्या नावावर आहे. संजूने आयपीएलमध्ये १२५ सामन्यांत १५० षटकार ठोकले होते. केएल राहुलने १००पेक्षा कमी सामन्यात हा पराक्रम केला आहे. रोहित शर्माने १२९ सामन्यांत आणि विराट कोहलीने १३२ डावांत १५० षटकार मारण्याचा करिष्मा केला आहे, मात्र सर्वांत वेगवान १५० षटकारांचा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर आहे.

## पोयनाडच्या क्रिकेट स्पर्धेत फार्महाऊस संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या ६०व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत श्री स्वामी समर्थ ओमसाई फार्महाऊस संघ विजेता ठरला.

अतिशय अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात पोयनाड सुपर जायंट्स संघाला पराभूत करीत श्री स्वामी समर्थ ओमसाई फार्महाऊस संघाने प्रथम क्रमांकाच्या चषकावर आपले नाव कोरले. तृतीय क्रमांक जय मल्हार ११ पोयनाड संघाने पटकाविला. विजेत्यांना बक्षीस देण्यात आले.

स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज व मालिकावीर विशाल निषाद, उत्कृष्ट गोलंदाज परेश चवरकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून ऋतिक जाधव याची निवड करून त्यांना आकर्षक चषक देत गौरविण्यात आले.

### ला लिगा फुटबॉल

# रेयाल माद्रिद संघाचे वर्चस्व



**माद्रिद : वृत्तसंस्था**

रेयाल माद्रिदने स्पॅनिश फुटबॉलवरील आपली मक्तेदारी कायम ठेवताना एस्पान्योलला ४–० अशा फरकाने पराभूत केले. या विजयासह त्यांनी विक्रमी ३५व्यांदा ला लिगा फुटबॉलच्या जेतेपदाला गवसणी घातली.

रेयालचा बुधवारी याच मैदानावर मँचेस्टर सिटीविरुद्ध चॅम्पियन्स लीगच्या उपांत्य फेरीचा दुसऱ्या टप्प्यातील सामना होणार आहे. पहिल्या टप्प्यातील सामन्यानंतर माद्रिद ३–४ अशा पिछाडीवर आहे.

तत्पूर्वी, एस्पान्योलविरुद्ध मिळवलेल्या विजयामुळे रेयालने चार सामने शिल्लक असताना ‘ला लिगा’च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी असलेल्या सेव्हियावर १७ गुणांची आघाडी मिळवली आहे. सेव्हियाने कॅडिजविरुद्धचा सामना १–१असा बरोबरीत सोडवला होता. एस्पान्योलविरुद्धच्या सामन्यात रेयालकडून रॉड्रिगोने (३३ आणि ४३वे मिनिट) दोन, तर मार्को असेन्सिओ (५५वे मि.) आणि तारांकित आघाडीपटू करीम बेन्झेमा (८१वे मि.) यांनी प्रत्येकी एक गोल केला.

# आगरदांडा संघाने भंडारी चषक जिंकला



**मुरूड : प्रतिनिधी**

१ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मुरूड तालुक्यातील ग्रामस्थ डोंगरी सुभा संस्था आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेत अटीतटीच्या अंतिम सामन्यात आगरदांड्याच्या जय बापदेव संघाने खारीकवाड्याच्या वादळ संघाचा पराभव करीत मानाचा भंडारी चषक जिंकला.

जय हनुमान खार आंबोली संघाने तृतीय, तर जय हनुमान डोंगरी संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील शिस्तबद्ध संघ म्हणून खार आंबोलीच्या गावदेवी संघाची निवड करण्यात आली. उत्कृष्ट खेळाडू सिद्धेश पिंगळे, उत्कृष्ट चढाईपटू जयेश यादव, तर उत्कृष्ट पकडपटू दिनेश गिरणेकर ठरला. त्यांनाही बक्षिसे देण्यात आली.

कबड्डी स्पर्धेचे औचित्य साधून भंडारी समाजातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांतील मुरूडसह अलिबाग, रोहा, श्रीवर्धन, मुंबई, ठाणे आदी भागांतील ५०हून अधिक मान्यवरांचा संस्थेतर्फे शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

## मँचेस्टर सिटी, लिव्हरपूल विजयी

**लंडन : वृत्तसंस्था**

मँचेस्टर सिटीने मोठ्या विजयाची नोंद करीत प्रीमियर लीग फुटबॉलच्या गुणतालिकेतील आपले अग्रस्थान कायम ठेवले असून लिव्हरपूलनेही विजय मिळवत जेतेपदाच्या शर्यतीत चुरस निर्माण केली आहे.

लिव्हरपूलने अनेक खेळाडूंना विश्रांती देऊनही न्यूकॅसल संघावर १–०असा विजय मिळवला. त्यांच्याकडून नाबी केटाने (१९वे मि.) गोल केला. त्यामुळे काही काळासाठी लिव्हरपूल गुणतालिकेत अग्रस्थानी पोहचला, मात्र काही तासांनंतर मँचेस्टर सिटीने लीड्सला ४–०अशी धूळ चारत पुन्हा गुणतालिकेत अग्रस्थान मिळवले.

# झिराड येथील जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत दिवलांग, पनवेल, नांदईचा पाडा संघ विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील झिराड येथील साई क्रीडामंडळ, महिला मंडळाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष खुल्या गटात श्री गणेश दिवलांग, तर महिलांमध्ये पनवेल संघाने विजेतेपद मिळवले. पंचक्रोशी गटात नांदई देवी नांदईचा पाडा हा संघ विजेता ठरला. खुल्या गटात अमिर धुमाळ, महिलांमध्ये रचना म्हात्रे, पंचक्रोशी गटात तुषार पाटील यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.



जिल्हास्तरीय पुरुष खुल्या गटात नवजीवन पेझारी संघ उपविजेता ठरला. तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे नवकिरण भेंडखळ व चतुर्थ जय हनुमान चरी यांनी मिळवला.

महिला गटात हिरकणी स्पोर्ट गडब संघ उपविजेता ठरला. ओमकार वेश्वी संघाने तृतीय, तर दिलखुष आवास संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

पंचक्रोशी गटात नागेश्वर आवास संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. जय हनुमान स्पोर्ट्स पुतुबाईचा पाडा व जय हनुमान वाघोडे या संघानी तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले.

खुल्या पुरुष गटात ऋषिक पाटील पब्लिक हिरो ठरला. अमित ठाकूर याला उत्कृष्ट पकडीचे, तर बिपीन थळे याला उत्कृष्ट चढाईचे बक्षीस देण्यात आले.

महिलांमध्ये वृणाली पाटील पब्लिक हिरो ठरली. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक हर्षला नाखवा हिला, तर उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक सायली पाटीलला देण्यात आले.

पंचक्रोशी गटात शिरीष भगत पब्लिक हिरो ठरला. सुमित माने याला उत्कृष्ट पकडीचे, तर सर्वेश पाटीलला उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक देण्यात आले.



## ‘आरटीआयएससी’च्या क्षितिज शिंदेचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा धावपटू क्षितिज शिंदे याने ठाणे येथे झालेल्या अथॅलेटिक्स स्पर्धेत यश मिळविले आहे.

व्हीपीएम्स अकॅडमी आणि जी. पी. पारसिक सहकारी बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथे अथॅलेटिक्स स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुलांच्या धावण्याच्या १०० मीटर शर्यतीत क्षितिज शिंदे याने द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याचे अभिनंदन होत आहे.





**पनवेल :** आर्या स्पोर्ट्स ओवळे आणि ग्रामस्थ मंडळ ओवळे–दापोली आयोजित आमदार ट्रॉफी आणि सिद्धेश ट्रॉफी स्पर्धेला भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड, दापोलीचे माजी उपसरपंच गजानन पाटील, संजय गायकवाड, रूपेश गायकवाड, पाटणोलीचे माजी उपसरपंच प्रकाश पाटील, युवा नेते निलेश खारकर, संदीप पाटील, धर्मा म्हात्रे आदी उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com